CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २२७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### देशात ४ नवीन कामगार संहिता लागू

**नवी दिल्ली :** सरकारने देशात नवीन ४ कामगार संहिता लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सोबतचे २९ जुने कायदे इतिहास जमा झाले असून त्यामुळे कामगार क्षेत्रात आता एक नवे पर्व सुरू झाले आहे. नव्या कायद्यांमुळे देशभरातील ४० कामगारांना सामाजिक सुरक्षेची गॅरंटी मिळणार आहे. गेल्या काही दिवसांपासून देशात नवीन कामगार संहिता अर्थात लेबर कोड लागू करण्याची प्रक्रिया सुरू होती. अखेर केंद्र सरकारने नवीन कामगार संहिता लागू करण्याची घोषणा केली आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाची माहिती केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी सोशल मीडियावरून दिलीय.

### अल्पवयीन मुलीवर कॉफी शॉपमध्ये अत्याचार

**बीड :** बीडच्या केजमध्ये एक धक्कादायक प्रकार घडला असून एका अल्पवयीन मुलीला एका तरुणाने कॉफी शॉपमध्ये नेवून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना घडलीय. या तरुणाने २० नोव्हेंबर रोजी मध्यरात्री एका चौदा वर्षीय मुलीचे अपहरण केले होते. यानंतर शहरातील एका कॉफी शॉपमध्ये घेवून जात तिच्यावर अत्याचार केले.दरम्यान, हा प्रकार कुटूंबीयांना समजताच त्यांनी तातडीने केज पोलीस ठाण्यात धाव घेते घडलेला प्रकार सांगितला. तक्रारीनुसार पोलिसांनी तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान या घटनेनंतर आरोपी फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहे.

### मुलावर बिबट्याचा हल्ला

**पालघर :** पालघरमधील विक्रमगड तालुक्यातील उतावळी आदर्श विद्यालयात शिकणाऱ्या ११ वर्षाच्या विद्यार्थ्यांवर बिबट्याने झडप घातली. अचानक झालेल्या या हल्ल्याने हा मुलगा भांबावला. मयंक विष्णू कुवरा हा शाळेसाठी रोज ८ किलोमीटरची पायपीट करतो. घरापासून त्याची शाळा ४ किलोमीटर आहे. शाळेला जाण्याचा रस्ता पण जंगलातून आहे. पण शाळेची ओढ असल्याने तो या सर्व अडचणीवर मात करतो. संध्याकाळी शाळा सुटल्यावर तो पडवीपाडा या त्याच्या वस्तीकडे परतत होता. तेव्हा झाडीत दडलेल्या बिबट्याने त्याच्यावर हल्ला चढवला. बिबट्याने मागून त्याच्यावर हल्ला चढवला. मयंकच्या पाठीवर दप्तर होते. बिबट्याचे पुढचे पाय या दप्तरावर पडले. यामुळे त्याची पाठ वाचली. पण हातावर बिबट्याच्या पंजामुळे खोल जखमा झाल्या. त्याच्या हाताला अनेक ठिकाणी टाके द्यावे लागले.

### ठाकरेंमुळे मुंबईत अडले आघाडीचे घोडे

**मुंबई :** मुंबई महापालिकेत ठाकरे बंधुंची युती होणार हे निश्चित झाले आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्यावर मविआचे तुकडे होणार असल्याचं निश्चित मानलं जातंय. कारण मनसे सोबत न जाण्यावर काँग्रेसचे नेते ठाम आहेत. मात्र उद्धव ठाकरेंची मात्र कोंडी झालीय. उद्धव ठाकरे काँग्रेसला सोबत घेण्यासाठी आग्रही आहेत आणि त्यासाठी ठाकरे काँग्रेसच्या हायकमांडच्या संपर्कात असल्याची माहिती आहे. तर दुसरीकडे मनसेला सोडा आणि काँग्रेससोबत या अशी नवी ऑफर काँग्रेसने ठाकरेंना दिल्याचीही माहिती आहे.

# भीषण अपघातात पाच जण ठार

**धाराशिव :** सोलापूर हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर धाराशिव येथे शनिवारी भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर काही जण जखमी झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, शनिवारी सकाळी ही क्रुझर गाडी सोलापूर-हैद्राबाद महामार्गावरुन जात होती. या गाडीतील प्रवासी सोलापूरवरुन नळदुर्ग येथे देवदर्शनासाठी निघाले होते. त्यावेळी धाराशिवमधील अणदूर परिसरात त्यांच्या जीपचे टायर्स अचानक फुटले. त्यामुळे चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि ही जीप एका ट्रॅक्टरला धडकून रस्त्यावर पलटी झाली.

अपघात झाल्यानंतर आजुबाजूचे नागरिक तातडीने मदतीसाठी धावले. काही नागरिकांनी जोर लावून क्रुझर गाडी सरळ करुन त्यामधून मृतदेह बाहेर काढले. आतापर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार, या अपघातामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये तीन महिलांचा

**टायर्स फुटून जीप ट्रॅक्टरला धडकली; सोलापूर–हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील घटना**



समावेश आहे. या अपघातामध्ये सात ते आठजण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे अपघातामधील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जखमींना उपचारासाठी सोलापूर येथे हलवले आहे.

या अपघातामध्ये मृत झालेले आणि जखमी झालेले सर्व प्रवासी दक्षिण उळे सोलापूर येथील असल्याचे समजते. या गाडीचे टायर्स फुटल्याने ही गाडी अनियंत्रित होऊन एका ट्रॅक्टरला धडकली. ही धडक इतकी जोरदार होती की, गाडीच्या एका भागाचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे.

या जबर धडकेमुळे गाडीत बसलेल्या पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. काही नागरिकांनी गाडीतील मृतदेह बाहेर काढून त्यानंतर जखमींना बाहेर काढले. सध्या पोलीस आणि स्थानिक प्रशासनाकडून बचावकार्य सुरु आहे. अपघाताच्यावेळी गाडीत क्षमतेपेक्षा जास्त लोक कोंबून बसवले होते. त्यामुळे पाच जणांचा मृत्यू आणि तब्बल ८ जण गंभीररित्या जखमी झाले आहेत.

## शिवसेना–मनसे एकत्रच: खा.राऊत

**मुंबई :** महापालिका निवडणुकीसाठी मनसेला महाविकास आघाडीत घ्यायचं की नाही यावरुन काँग्रेसमध्ये मतमतांतरे आहेत. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी मनसेसोबत जाण्यास नकार दिल्याचं दिसतंय. तर विजय वडेट्टीवार यांचा मात्र मनसेला सोबत घेण्याकडे कल आहे. राष्ट्रवादीचे शरद पवारही मनसेला सोबत घेण्याविषयी सकारात्मक दिसतात. शिवसेना–मनसे हे आधीपासूनच एकत्र आहेत, ही लोकांची इच्छा असल्याचं मत राऊतांनी व्यक्त केलं.

## पंतप्रधानांच्या तपपूर्तीनिमित्त 'तरुण भारत'च्या विशेषांकासाठी मुख्यमंत्री फडणवीसांशी चर्चा

**त.भा. वृत्तसेवा,**

**धाराशिव :** देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या तपपूर्ती निमित्त



तरुण भारत परिवारातर्फे प्रकाशित होणाऱ्या विशेषांकाबाबत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषांकाची मुख्य संकल्पना, विषय वैशिष्ट्ये, मांडणी आणि संपादकीय दिशा याबाबत मुख्यमंत्र्यांना तपशीलवार माहिती देण्यात आली.

याप्रसंगी विधीमंडळ सभापती ॲड. राहुल नार्वेकर, मंत्री पंकजा मुंडे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. राणाजगजितसिंह पाटील, आ. अभिमन्यू पवार, अर्चनाताई पाटील, मेघराज पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे यांच्यासह या भेटीवेळी तरुण भारत धाराशिव जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे आणि उपसंपादक विपीन वीर उपस्थित होते.

विशेषांक अधिक सर्वसमावेशक, दर्जेदार आणि प्रेरणादायी व्हावा यासाठी संपादकीय टीमने केलेल्या तयारीची माहिती त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिली. विशेषांकात नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील प्रवास, नेतृत्वक्षम कार्यशैली, निर्णायक धोरणनिर्मिती, विकासाभिमुख उपक्रम आणि राष्ट्रनिर्मितीसाठी दिलेल्या योगदानाचा सखोल वेध घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तरुण भारतच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले. विशेषांकात मोदी यांच्या कार्यशैलीचा सर्वांगीण आढावा, शासन व्यवस्थेत आणलेले नवोन्मेष,

**मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून तरुण भारतच्या उपक्रमाचे कौतुक व शुभेच्छा**

तसेच समाजामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणाऱ्या त्यांच्या उपक्रमांचा समावेश करण्याचा सल्ला त्यांनी दिला. हा विशेषांक तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल आणि वाचकांना विचारप्रवर्तक दृष्टी देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी संपादकीय टीमला शुभेच्छा देत विशेषांक तथ्यपूर्ण, अभ्यासपूर्ण आणि जनसामान्यांसाठी उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तरुण भारत परिवाराच्या या पुढाकारामुळे विशेषांकाबाबतची उत्सुकता अधिक वाढली असून, लवकरच तो वाचकांच्या हाती येणार आहे.

## अजित पवार पोलिसांसह कार्यकर्त्यांवर चिडले

**जालना :** अजित पवार यांचं परतूर येथील सभा स्थळी आगमन होताच ते पोलिसांसह कार्यकर्त्यांवर चिडले, व्यासपीठावरील पाठीमागच्या लाईनमध्ये बसलेले निवडणुकीतील उमेदवार उपस्थित लोकांना दिसत नसल्याने अजित पवारांनी व्यासपीठाच्या खाली पुढे कार्यकर्त्यांना खुर्च्या टाकायला सांगितल्या आणि व्यासपीठापुढे खुर्च्या टाकून उमेदवारांना खुर्च्यांवर बसायला सांगितलं. आधी पोलीस या ठिकाणी खुर्च्या टाकायला परवानगी देत नव्हते. मात्र अजित पवारांनी 'मी तुम्हाला सांगतो', असं पोलिसांना सांगत निवडणुकीतील उमेदवारांना व्यासपीठाच्या पुढे बसायला सांगितले.

# झोपलेल्या राजकीय पक्षांना निवडणुका जिंकता येत नाहीत

**कोल्हापूर :** झोपलेल्या राजकीय पक्षांना निवडणुका जिंकता येत नाहीत असं म्हणत जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री गुलाम नबी आझाद यांनी



काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यावर टीका केलीय. गुलाम नबी आझाद आज कोल्हापुरात माध्यमांशी बोलत होते. बिहारमधील निवडणुका जिंकल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगाल जिंकण्याच्या तयारीची घोषणा केली. मात्र, इतर पक्ष निवडणुका जाहीर झाल्या तरी त्या त्या राज्यामध्ये जात नाहीत. अशा कार्य पद्धतीने निवडणुका जिंकता येत नाहीत म्हणत आझाद यांनी राहुल गांधी यांना टोला लगावला.

पहलगामसारख्या हल्ल्यांमुळे जम्मू–काश्मीर अनेक वर्षे मागे गेल्याचे माजी मुख्यमंत्री गुलाम नबी आझाद यांनी म्हटलं आहे. गुलाम नबी आझाद कोल्हापुरात माध्यमांशी बोलत होते. त्यांनी काश्मीरमधील सुरक्षा परिस्थिती, पर्यटन क्षेत्राची झालेली पडझड आणि देशातील राजकीय वातावरणावर सविस्तर भाष्य करत मुद्दे मांडले. पहलगामसारख्या हल्ल्यांमुळे जम्मू–काश्मीर अनेक वर्षे मागे गेल्याचे ते म्हणाले.

या घटनेनंतर पर्यटन अचानक कोसळले, हजारो पर्यटकांनी काश्मीरच्या दौरा रद्द केला आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पर्यटन क्षेत्राला जबर धक्का बसला. लहान–लहान हॉटेल

**गुलाम नबी आझाद यांची राहुल गांधींवर टीका**

व्यवसाय, होम–स्टे, टुरिस्ट टॅक्सी चालक आणि स्थानिक मार्गदर्शक या सगळ्यांचे आर्थिक गणित कोलमडून पडली असल्याचे ते म्हणाले. मात्र आजची परिस्थिती पूर्णपणे बदलली असून अशा प्रकारचे मोठे दहशतवादी हल्ले पुन्हा होतील, अशी शक्यता नसल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे पर्यटकांनी पुन्हा एकदा या प्रदेशाला भेट द्यावी, असे त्यांनी आवाहन केले.

देशातील निवडणूक प्रक्रियेवर वेळोवेळी उपस्थित होणाऱ्या शंकांवरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. ईव्हीएमवर आरोप करणाऱ्यांकडे कोणताही ठोस पुरावा नसताना ते केवळ पराभवानंतर शंका घेतात, असा त्यांचा आरोप आहे. जेव्हा विजय मिळतो तेव्हा हाच ईव्हीएम योग्य वाटतो आणि पराभव झाला की अचानक मशीन दोषी ठरते, अशी टीका त्यांनी केली. पाच वर्षे लोकांमध्ये न जाता केवळ निवडणूक जाहीर झाली की राज्यात उडी मारण्याची सवय विरोधकांमध्ये वाढत चालली आहे, असे ते म्हणाले. वर्षभर व्होट चोरीचे आरोप करणारेच पराभूत झाले, असे त्यांनी सांगितले.









लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शहरातील पार्किंगला शिस्त लागणार तरी केव्हा?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** लातूर शहरातील मुख्य बाजारपेठेतील पार्किंगला शिस्त लागणार तरी केव्हा? असा प्रश्न वाहनधारकांतून उपस्थित केला जात आहे. शहराच्या मुख्य बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावर म्हणजे हनुमान चौकापासून गंज गोलाईपर्यंत पार्किंगसाठी सम विषम तारखा ठरवून देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे काही काळ शिस्त पाळली गेली. आता पुन्हा समविषमची शिस्त न पाळता रस्त्याच्या दोन्ही बाजुंना वाहने लावली जात असल्याचे दिसून येते. तसेच पार्किंगसाठीच्या जागेवर हातगाडीवालेही बऱ्याच ठिकाणी जागा अडवून बसलेले दिसून येतात. वाहनधारक वाहन लावण्यासाठी जागेचा शोध घेत असतानाही हातगाडीवाले जसे काही ते जेथे थांबतात त्या जागेचे भाडे भरत असल्याप्रमाणे वाहनधारकांना जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्नही करत नाहीत. गंज गोलाईतही अर्ध्याहून अधिक रस्ता अतिक्रमण केलेल्या हातगाडेवाल्यानी बळकावलेला असल्याने पार्किंगसाठी उपलब्ध करून दिलेल्या जागेवरहीवाहने पार्क जिकिरीचे बनल्याचे पाहावयास मिळते. त्यामुळे किमान मुख्य बाजारपेठेतील पार्किंगला तरी लवकरात लवकर शिस्त लावण्याचा प्रयत्न मनपा प्रशासनाने करावा, अशी मागणी होत आहे.



# विलासराव देशमुख मार्ग बनलाय अनाधिकृत कचऱ्याचे आगार !

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** स्वच्छता आणि लातूर शहराचा दुरान्वयेही संबंध नसल्याचे शहर व परिसरातील एकंदर स्वच्छतेच्या कारभारावरून दिसून येते. शहराच्या चारही बाजुंनी असणाऱ्या वळण रस्त्यावर कचरा टाकून नागरिकांच्या आरोग्यास बाधा पोहोचवण्याचा होत असलेला प्रयत्न ऐरणीवर असतानाच आता शहराच्या अगदी भर वस्तीत विलासराव देशमुख मार्गावर रस्त्यालगत कचरा टाकला जात असल्याचे असंख्य लातूरकर उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या नावे उभारण्यात आलेला हा मार्गच अनधिकृत कचऱ्याचे आगार बनल्याचे पाहण्याची वेळ लातूरकरांवर येऊन ठेपली आहे.

स्वच्छ लातूर सुंदर लातूर असे बोलताना, सांगताना अतिशय गोड वाटत असले तरी प्रत्यक्षात तसे आहे का? असा प्रश्न कोणीही सुजाण नागरिकाने उपस्थित करावा अशी लातूर शहरातील परिस्थिती आहे. शहर महानगरपालिकेचा आणि स्वच्छतेचाही जणू अर्थाअर्थी काहीही संबंध नसल्याचे जाणवते. लातूर मनपाचा कार्यकाळ समाप्त होऊन आता तीन साडेतीन वर्षे उलटत आहेत. त्यामुळे या दरम्यान मनपाचा कारभार प्रशासकांच्याच हातात आहे. अजूनही मनपाचा निवडणूक कार्यक्रम घोषित होण्यास अवधी असल्याने किमान आणखी चार पाच महिने हे प्रशासकराज कायम राहण्याची शक्यता आहे. तोपर्यंत लातूरवासियांना अशा अनेक प्रश्नांना तोंड देत दिवस काढावे लागणार आहेत.

लातूर शहरातील असा कोणताही भाग, परिसर नाही, ज्या ठिकाणी अनधिकृत ठिकाणी कचरा टाकला जात नाही. शहराच्या अंतर्गत भागात ही बाब फारशी आक्षेपार्ह मानली जात नसली तरी मुख्य रस्ता वा मुख्य रस्त्याला समांतर असणाऱ्या रस्त्यावर, रस्त्यालगत कचरा टाकला जात असेल तर नक्कीच योग्य दिसणार नाही. याचा



विचार मनपाच्या स्वच्छता विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी करायला हवा.

लातूर शहरातील मुख्य रस्ता सोडून दुसरा रस्ता जुन्या रेल्वे लाईन परिसरातून काढण्यात आला आहे. या रस्त्याला दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांचे नाव देण्यात आले आहे. या रस्त्यालगत ठिकठिकाणी अस्वच्छता पाहावयास मिळते. हे तर काहीच नाही, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयाच्या अगदी पाठीमागच्या बाजूस शहराच्या अन्य भागातून संकलित करून आणलेलाकचरा टाकला जात असल्याचे पाहावयास मिळते. हा प्रकार मागच्या अनेक दिवसांपासून आहे.

लातूर शहरातील वाहतूक कोंडी वाढल्याने या रस्त्यावरही आता कायम वाहतुकीची वर्दळ असते. पूर्वी हा रस्ता जास्त वापरात नसल्याने कचरा टाकण्याचा विषय फारसा चर्चिला गेला नाही. आता या रस्त्यावरही कमालीची वाहतूक वाढल्याने जिल्हा बँकेच्या मागच्या भागात टाकल्या जाणाऱ्या या कचऱ्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत आहे. या भागातून जाताना प्रत्येक वाहनधारकाला नाक बंद करून किंवा नाकाला रुमाल बांधूनच जावे लागत आहे. या वाढत्या दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याचे प्रश्नही निर्माण होण्याची भीती बळावत चालल्याचे दिसून येते.

पावसाळ्यात तर वाढत्या दुर्गंधीमुळे नागरिकांना या रस्त्यावरून जाणे म्हणजे दिव्यच वाटत होते. हे ठिकाण कचरा टाकण्याचे अधिकृत नाही. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणच्या रस्त्यालगत असा कचरा टाकणेही योग्य नाही. त्यामुळे मनपाच्या स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी कचरा टाकला जाणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशी अपेक्षा सामान्य लातूरकर बाळगून आहेत.

अनधिकृत कचरा आगारामुळे या भागात डुकरे, मोकाट कुत्रे तथा अन्य प्राण्यांचा वावरही वाढला आहे. त्याचाही नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. कचरा टाकण्यासाठी मनपाने संबंधित कर्मचाऱ्यांना जागा निश्चित करून द्याव्यात आणि त्या जागा नागरी वस्तीपासून दूर असाव्यात, अशी मागणी वाढीस लागली आहे.

# मांजरा पट्ट्यातील दहशत मतदारांनी मोडीत काढली : आ. कराड

लातूर दि. २२ - मांजरा पट्ट्यात वर्षानुवर्ष देशमुखांची असलेली दहशत मोडीत काढण्याचे आणि प्रस्थापितांना उलथून टाकण्याचे काम लातूर ग्रामीणच्या मतदारांनी विधानसभा निवडणुकीत

### काटगाव जिप मधून पूर्वादेवी देशमुख यांची तर तांदूळजा मधून दिपक वांगस्कर यांना भाजपाची उमेदवारी जाहीर

केले. ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही असे सांगून भाजपाच्या वतीने काटगाव जिल्हा परिषद गटातून पूर्वादेवी नाथसिंह देशमुख आणि तांदूळजा गटातून दीपक वांगस्कर यांची उमेदवारी जाहीर करून लातूर ग्रामीण मतदार संघातील सर्वच तेराही जागेवर भाजपा विजयी होणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण मंडळाच्या वतीने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने आ. कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा जिल्हा परिषद गटाचा भाजपाच्या विजयाचा संकल्प मेळावा शुक्रवारी झाला.



मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विष्णूआप्पा मोहिते हे होते तर या मेळाव्यास भाजपाच्या नेत्या डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते नाथसिंह देशमुख, संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, शरद दरेकर, उद्धव काळे, मुरुडचे उपसरपंच वैभव सापसोड, सतीश आंबेकर, पद्माकर चिंचोलकर, योगीराज साखरे, श्याम वाघमारे, भैरवनाथ पिसाळ यांच्यासह इतर अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मांजरा परिवाराने पहिल्यांदाच उसाचा भाव जाहीर केला, देणार आहेत की नाही माहित नाही. पाच वर्षात बावीशे, पंचेवीशे, सत्तावीशे दिला. गेल्या पाच वर्षात साखरेचा भाव सारखाच असताना आत्ताच ऐकतीशे का भाव जाहीर केला असा प्रश्न उपस्थित करून आत्तापर्यंत झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम विधानसभेतील विजयातून झाले. ही तुमच्या मताची किंमत आहे. अनेक पुरस्कार घेणारे मांजरा परिवारातील कारखाने तोट्यात का आहेत कर्जबाजारी का झाले असा प्रश्न उपस्थित करून शेतकऱ्यांना सन्मानाची वागणूक दिली पाहिजे यासाठी माझा संघर्ष असल्याचे बोलून दाखवले. ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी, विकासासाठी येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपाला बहुमताने विजयी करावे असे आव्हान करून आ. रमेशआप्पा कराड यांनी काटगाव जिल्हा परिषद गटातून पूर्वादेवी नागसिंह देशमुख यांची तर तांदूळजा गटातून दीपक वांगस्कर यांची आणि तांदूळजा गणातून सुचिता अंकुश गणगे गादवड गणातून बाबा भिसे यांची उमेदवारी जाहीर केली. याप्रसंगी दीपक वांगस्कर, प्रशांत नानजकर, महादेवआबा गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त करून येणाऱ्या निवडणुकीत मतदार भाजपा सोबत असल्याचे बोलून दाखवले तर भैरवनाथ पिसाळ यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात झालेल्या विविध विकास कामाची माहिती दिली. सूत्रसंचालन शाम भोळे यांनी तर सचिन कांबळे यांनी आभार मानले.

# ३०० किलो सिंगल युज प्लास्टिकचा साठा जप्त

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या एका पथकाने शनिवारी (दि. २२) गंजगोलाई परिसरातील एका गोडाऊन वर छापा टाकून अंदाजे ३०० किलो सिंगल युज प्लास्टिकचा साठा जप्त केला. संबंधितास ५ हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला.

सिंगल युज प्लास्टिकच्या वापरास बंदी आहे. असे असतानाही काही लोक प्लास्टिकचा वापर करत असल्याचे निदर्शनास आल्याने मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार उपायुक्त श्रीमती वसुधा फड, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख,स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी रवी कांबळे यांच्या पथकाने छापा मारून ही कारवाई केली.

व्यावसायिक आणि नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर करू नये. यापुढे बंदी असणाऱ्या प्लास्टिकचा वापर केल्याचे आढळले तर ते जप्त करून दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे. या कारवाईत मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीराम सोनवणे, शिवराज शिंदे, अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक प्रदीप गायकवाड यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

# 'दयानंद' मध्ये सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या किमान समान कार्यक्रमानुसार सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्यासाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सायबर पोलीस ठाणे व दयानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच दयानंद कला महाविद्यालय येथे जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, पोलीस निरीक्षक श्रीमती बबीता वाकडकर, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी लातूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. योगेश डी. जगताप, दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक प्रा. डॉ. प्रशांत दीक्षित, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे कर्मचारी व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

गिरवलकर यांनी यावली माहिती तंत्रज्ञान कायदा २००० बाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. सायबर गुन्हा म्हणजे काय, सायबर गुन्हेगार कोण असतात व ऑनलाईन घोटाळा, ऑनलाईन खंडणी हल्ला, सायबर छळवणूक, सायबर पाठलाग, ऑनलाईन अंमल पदार्थ तस्करी, बौद्धीक मालमत्ता उल्लंघन व ऑनलाईन भरती प्रकीया फसवणूक याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पोलीस निरीक्षक श्रीमती बबीता वाकडकर यांनी विद्यार्थ्यांना पीपीटीद्वारे सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन केले. आज सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे, त्यामुळे तरूण पिढीने सायबर गुन्ह्यांबाबत जागरूक असणे गरजेचे आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करूण वेगवेगळ्या प्रकारचे सायबर गुन्हे समाजात घडत आहेत, आर्थिक नुकसान, लैंगिक छळाच्या सायबर गुन्ह्याचे प्रमाण वाढीस लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांनी सायबर गुन्ह्यांबाबत सदैव जागरूक राहण्याचे आवाहन केले.

# आ. देशमुख यांचा बाभळगावमध्ये नागरिकांशी संवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** राज्याचे माजी मंत्री तथा आ. अमित देशमुख यांनी आज, शनिवार दि. २२ नोव्हेंबर २५ रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर व जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिकांच्या भेटी घेतल्या. माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आलेल्या नागरिकांच्या अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या आणि त्यांच्या निमंत्रणांचा स्वीकार केला. तसेच, संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी तात्काळ सूचना केल्या.

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, माजी महापौर दीपक सूळ, विलास को-ऑपरेटिव बँक व्हाईस चेअरमन समद पटेल, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर महानगराध्यक्ष सुनील बसपुरे, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य धनंजय देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, पत्रकार नेताजी जाधव, हनमंत पवार, सिकंदर पटेल, दिनेश गोजमगुंडे, व्यंकटेश पुरी, प्रा. बालाजी वाघमारे, रमेश थोरमोठे, प्रा.डॉ. शिवाजी जवळगेकर, प्रवीण घोटाळे, मोहन माने, ज्ञानेश्वर पाटील, महेश इंगळे, मनोज चिखले, आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.



# खोटा गुन्हा नोंद करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांसह महावितरण अधिकारी-कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

### श्रीकर फड यांची पत्रकार परिषदेत मागणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात आपल्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यास भाग पाडणाऱ्या महावितरणच्या मुख्य अभियंत्यासह पोलीस निरीक्षक समाधान चावरे, पोलीस उपनिरीक्षक मुन्ना देशमुख यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी व्यावसायिक श्रीकर त्र्यंबकराव फड यांनी शनिवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केली.

आपल्या स्वतःच्या कमर्शियल जागेतील कालबाह्य झालेली कमकुवत विद्युत लाईन स्थलांतरित करण्याकरिता आवश्यक असणारी सर्व प्रक्रिया पार पाडून, नियमाप्रमाणे पूर्ण रक्कम



भरणा करूनही महावितरणचे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहेत. तसेच या संदर्भातील दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी आपण न्यायालयात याचिका दाखल करून केली होती. आपल्या याचिकेप्रमाणे अंबाजोगाई न्यायालयाने दोषी अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. असे असतानाही कर्तव्यात कसूर करणाऱ्या महावितरणच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न महावितरणचेच अधिकारी, कर्मचारी करत असल्याचे निदर्शनास आले आहे, असे सांगून श्रीकर पुढे म्हणाले की, लातूर एमआयडीसी परिसरातील महावितरणच्या कार्यालयात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी आपल्याला त्यांच्या कार्यालयात ते स्वतः हजर नसताना जावक क्रमांक नसलेला अहवाल घेऊन जाण्यास बोलावले होते. आपण त्यांची भेट घेऊन चर्चा करण्याच्या उद्देशाने कार्यालयातील त्यांच्या केबिनमध्ये बसलो असताना तेथून जबरदस्तीने पोलीस बळाचा वापर करुन आपल्याला एमआयडीसी पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चावरे व पोलीस उपनिरीक्षक मुन्ना देशमुख यांनी आपल्याला एखाद्या सराईत गुन्हेगारांसारखी वागणूक दिली. आपल्याला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून कोठडीत बेकायदेशीरपणे डांबून ठेवल्याचा आरोपही श्रीकर फड यांनी यावेळी केला. तसेच या पत्रकार परिषदेत श्रीकर यांनी त्यांच्यावर समाधान चावरे यांच्याकडून करण्यात आलेल्या मारहाणीचा, शिवीगाळीचा व्हिडिओही पत्रकारांना दाखविला.

पोलीस अधिकारी चावरे यांच्या सारख्या फिर्यादीलाच आरोपी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोल्स अधिकाऱ्यांमुळे संपूर्ण लातूर पोलीस दलाची प्रतिमाच मलीन होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणी आपण मानवाधिकार आयोग, नांदेडचे पोलीस उपमहानिरीक्षक, लातूरचे पोलीस अधीक्षक, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडेही रितसर तक्रार करून पोलीस निरीक्षक समाधान चावरे व महावितरणच्या संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याची मागणी केल्याचे सांगितले. पोलीस दलात सामान्यांना मदत, सहकार्य करणारे अनेक पोलीस अधिकारी आहेत. मात्र, चावरे यांच्यासारख्या बोटांवर मोजण्याइतक्या प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांमुळे पोलीस दलाची प्रतिमा डागाळली जात असेल तर त्यावर वरिष्ठानी वेळीच उचित कार्यवाही करणे गरजेचे असल्याचे श्रीकर यांनी स्पष्ट केले. यावेळी ॲड. अनंत केंद्रे यांचीही उपस्थिती होती.

## थोडक्यात...

### खुलताबादला निवडणूक निरीक्षक यांची भेट



**खुलताबाद, दि.२२ :** खुलताबाद नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी नियुक्त निवडणूक निरीक्षक शैलेश सूर्यवंशी, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांनी नगरपरिषद कार्यालय खुलताबाद येथे भेट देऊन सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या अनुषंगाने संपूर्ण पाहणी केली. यावेळी त्यांनी निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या सर्व प्रशासकीय व तांत्रिक व्यवस्था, मतदान केंद्रांची तयारी, मनुष्यबळ नियोजन तसेच सुरक्षाव्यवस्था यांचा तपशीलवार आढावा घेतला. तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी स्वरूप कंकाळ. मुख्याधिकारी नगरपरिषद सहाय्यक निवडणूक अधिकारी यांनी निवडणुकी संबंधी सर्व माहिती दिली. यावेळी कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे, जितेंद्र बोचरे, श्रीहरी चौडेकर, अश्विनी नंदा, अंकुश भराड पाटील, मनीषा लघाने, तसेच त्यांनी, स्ट्राँग रूम ची प्रत्यक्ष पाहणी करून ईव्हीएम यंत्रांची सुरक्षा, तांत्रिक व्यवस्थापन, सीसीटीव्ही कॅमेरे नियंत्रण आणि प्रवेश नियंत्रण व्यवस्था समाधानकारक असल्याचे नमूद केले.

### विधिज्ञांसाठी दोन दिवसीय परिसंवादाचे आयोजन

**अहिल्यानगर, दि. २१ :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने २२ व २३ नोव्हेंबर २०२५ रोजी राजश्री शाहू महाराज सेमिनार हॉल, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथे प्रशिक्षित व अप्रशिक्षित विधिज्ञांसाठी दोन दिवसीय मध्यस्थी परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती उच्च न्यायालय, मुंबईचे डेप्युटी रजिस्ट्रार प्रवीण कुंभोजकर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी दिली. या प्रशिक्षणाला महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव एम.एस. आझमी उपस्थित राहणार आहेत. तसेच परिसंवादाचे अध्यक्षस्थान जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्रीमती अंजू शेंडे भूषविणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून अहिल्यानगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे आणि सेन्ट्रल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी उपस्थित राहणार आहेत.

### भाभीजी घर पर हैं–फन ऑन द रन' चित्रपट थिएटर्समध्ये प्रदर्शित

**मुंबई :** दहा वर्षांहून अधिक काळापासून झी एंटरटेनमेंटची 'भाभीजी घर पर हैं' ही भारतातील सर्वात लोकप्रिय कॉमेडी मालिका राहिली आहे. या मालिकेने आपल्या लोकप्रिय पात्रांमुळे प्रेक्षकांची मने जिंकली: विभूतीजींचे आकर्षण, तिवारीजींचा ड्रामा, अंगूरी भाभीचे सही पकडे हैं!, अनीता भाभींची आत्मविश्वासपूर्ण मोहकता आणि हप्पू सिंग व सक्सेना यांचे आय लाइक इट! ही अविस्मरणीय धमालीने पिढ्यान् पिढ्या प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. देशातील सर्वात दीर्घकाळ चालणाऱ्या आणि सर्वाधिक आवडत्या टीव्ही शो पैकी एक म्हणून, या मालिकेचे प्रेक्षकांसोबतचं नाते वर्षागणिक अधिकधिक घट्ट होत गेले आहे.भारतीय इतिहासात पहिल्यांदाच, अजूनही सुरू असलेला एक शो मोठ्या पडद्यावर झेप घेत आहे. झी सिनेमा आणि झी स्टुडिओज 'भाभीजी घर पर हैं – फन ऑन द रन' हा चित्रपट ६ फेब्रुवारी २०२६ रोजी थिएटर्समध्ये घेऊन येत आहेत.

### 'कैरी' रोमँटिक थ्रिलर १२ डिसेंबरला प्रदर्शित

**छत्रपती संभाजीनगर, दि.२२ :** नॅशनल अवॉर्ड विनिंग दिग्दर्शक शंतनू गणेश रोडे यांचा रोमँटिक थ्रिलर 'कैरी' हा मराठी सिनेमा येत्या १२ डिसेंबरपासून महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. नुकतेच पोस्टर आणि रिलीज डेट जाहीर केली असून चित्रीकरणापासूनच या चित्रपटाबाबत उत्सुकता होती. चित्रपटात सायली संजीव, सुबोध भावे, सिद्धार्थ जाधव, शशांक केतकर, अरुण नलावडे, सुलभा आर्या आदी कलाकार मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. विशेष म्हणजे सायली संजीव आणि सिद्धार्थ जाधव प्रथमच एकत्र स्क्रीन शेअर करत आहेत. ९१ फिल्म स्टुडिओज प्रस्तूत व अमेय विनोद खोपकर एंटरटेनमेंट सहनिर्मित या चित्रपटाचे निर्माते नवीन चंद्रा, नंदिता राव कर्नाड, स्वाती खोपकर, निनाद बत्तीन, सहनिर्माते तबरेझ पटेल आहेत. लेखन स्वरा मोकाशी, छायांकन प्रदीप खानविलकर, संकलन मनीष शिर्के यांनी केले असून संगीत निषाद गोलांबरे व पंकज पडघन, पार्श्वसंगीत साई पियूष यांचे आहे. रोमँटिक थ्रिलर शैलीत कोणते ट्विस्ट पाहायला मिळणार याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे.

### जेबीएम ग्रुपने पोर्तुगालच्या सोडेसिया ऑटोमोटिव्हसोबत संयुक्त उपक्रमाची घोषणा केली

मुंबई – ३.३ अब्ज अमेरिकन डॉलर्सचा समूह असलेल्या जेबीएम ग्रुपने सोडेसिया ऑटोमोटिव्ह इंटरनॅशनल एसए, या आघाडीच्या जागतिक ऑटोमोटिव्ह घटक कंपनीसोबत एक धोरणात्मक संयुक्त उपक्रमात प्रवेश केला आहे. या सहकार्यातून भारतीय ऑटोमेकर्ससाठी अत्याधुनिक हॉट स्टॅम्प्ड ऑटोमोटिव्ह सिस्टीम आणि असेंब्ली विकसित आणि तयार केल्या जातील. एकत्रितपणे, दोन्ही कंपन्या चाकण औद्योगिक क्षेत्रात अत्याधुनिक हॉट स्टॅम्पिंग सुविधांसह एक आधुनिक उत्पादन प्लांट स्थापन करतील. अंदाजे १५० कोटींच्या गुंतवणुकीसह बांधलेला हा प्लांट आर्थिक वर्ष २७ च्या दुसऱ्या तिमाहीपासून कार्यरत होईल.पुणे येथील चाकण येथील जेबीएम ग्रुपच्या नील मेटल प्रॉडक्ट्स लिमिटेड युनिटमध्ये महाराष्ट्र आणि गुजरातचे माननीय राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते नवीन प्लांटची पायाभरणी केली. जेबीएम ग्रुपचे अध्यक्ष एस.के. आर्य, उपाध्यक्ष निशांत आर्य आणि सोडेसियाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

### अनधिकृत सोशल मीडिया ग्रुप्सबाबत सतर्क

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ :** एंजल वन लिमिटेड या आघाडीच्या फिनटेक कंपनीने त्यांच्या नावाचा व अधिकारी असल्याचा खोटा दावा करून गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या वॉट्सॲप व टेलिग्रामवरील अनधिकृत ग्रुप्सबाबत इशारा दिला आहे. कंपनीने सांगितले की या ग्रुप्समार्फत सेबी नोंदणीशिवाय गुंतवणुकीचे सल्ले, हमीपूर्ण परतावे व परफॉर्मन्सबाबत दिशाभूल करणारे दावे केले जात आहेत. याबाबत एंजल वनचा कोणताही थेट वा अप्रत्यक्ष संबंध नसून अशा ॲप्स, लिंक किंवा ग्रुप्समुळे झालेल्या नुकसानीस कंपनी जबाबदार राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. एंजल वनने म्हटले आहे की कंपनी अधिकृत चॅनेल्सखेरीज ग्राहकांशी संपर्क करत नाही, संवेदनशील वैयक्तिक माहिती मागत नाही, निधी हस्तांतराची विनंती करत नाही तसेच कोणत्याही परताव्याची हमी देत नाही.

# एमजीएममध्ये पाच दिवसीय आंतर विद्यापिठीय युवा महोत्सवाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ :** असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या ३९ व्या आंतर विद्यापीठीय सेंट्रल झोन युवा महोत्सवाचे आयोजन २५ ते २९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान एमजीएम विद्यापीठात होत आहे. या महोत्सवाचे यजमानपद प्रथमच एमजीएम विद्यापीठाला मिळाले असून मध्यप्रदेश, छत्तीसगड, मराठवाडा आणि विदर्भातील २४ विद्यापीठांतील ११०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

महोत्सवाचे उद्घाटन २५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जेएनईसी लॉन्स येथे पद्मश्री नाना पाटेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होईल. या कार्यक्रमास एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव,







कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांच्यासह सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.

पाच दिवस चालणाऱ्या या युवा महोत्सवात संगीत, नृत्य, साहित्य, रंगभूमी आणि फाईन आर्ट्स या पाच प्रमुख कलाप्रकारांत २७ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये म्युझिकच्या ९, डान्सच्या ३, लिटररीच्या ५, थेटरच्या ४ आणि फाईन आर्ट्सच्या ६ स्पर्धांचा समावेश आहे. विविध कलावंतांना आपली कला, कौशल्ये आणि प्रतिभा सादर करण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. समारोप सोहळा शनिवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता सुप्रसिद्ध अभिनेते उपेंद्र लिमये यांच्या उपस्थितीत पार पडेल.

एआययु १९८५ पासून देशभरातील विद्यापीठांसाठी राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावर इंटर युनिव्हर्सिटी युवा महोत्सवांचे आयोजन करत आहे. सुमारे ४ कोटी विद्यार्थीवर्गापर्यंत पोहोचणारी ही एकमेव राष्ट्रीय समन्वयक संस्था असून विविधतेतील ऐक्य, कला आणि भारतीय सांस्कृतिक परंपरेचा प्रसार हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू आहे.

एमजीएम विद्यापीठात अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, वाणिज्य, समाजशास्त्र, कला, फाईन आर्ट्स, डिझाईन, पत्रकारिता, मानसशास्त्र, विधी, फॉरेन्सिक सायन्स, फार्मसी आणि योग यांसह अनेक क्षेत्रातील पदवी, पदव्युत्तर, प्रमाणपत्र आणि पीएच.डी. अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देणे हे विद्यापीठाचे ध्येय असल्याचे यावेळी स्पष्ट केले.

## छ. संभाजीनगर ईव्ही उत्पादनासाठी राष्ट्रीय केंद्र बनण्याच्या दिशेने; सीआयआय परिषदेत चर्चा

**त.भा. वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि.२२ :** भारतीय उद्योग महासंघ (सीआयआय) मराठवाडा झोनल कौन्सिलतर्फे ईव्ही मॅन्युफॅक्चरिंग एक्सलन्स परिषद, प्रदर्शन व बी२बी बैठक छत्रपती संभाजीनगर येथे यशस्वीरित्या संपन्न झाली. धोरणकर्ते, ईव्ही ओईएम, घटक उत्पादक, बॅटरी कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार आणि गुंतवणूकदारांच्या सहभागातून प्रादेशिक ईव्ही उत्पादनाला गती देण्यावर भर देण्यात आला.

सीआयआयच्या उपाध्यक्षा डॉ. सुचित्रा के एला यांनी उद्योग सदस्यांशी संवाद साधताना सांगितले की, नवोपक्रम, स्पर्धात्मकता आणि तंत्रज्ञान अवलंब हा भारताच्या उत्पादन प्रवासाचा केंद्रबिंदू आहे. छत्रपती संभाजीनगरसारखे प्रदेश ईव्ही व स्वच्छ गतिशीलता क्षेत्रात औद्योगिक वाढीचे नेतृत्व करणार आहेत.




कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी सीआयआय मराठवाडा झोनल कौन्सिलचे अध्यक्ष प्रशांत नरवाडे यांनी मराठवाडा ऑटोमोटिव्ह आणि ईव्ही उत्पादनासाठी वेगाने पसंतीचे ठिकाण ठरत असल्याचे सांगितले. तर सीआयआय पश्चिम विभागाचे अध्यक्ष ऋषी बागला यांनी ईव्ही संक्रमण महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक संधी असल्याचे नमूद केले.

एथर एनर्जीचे सीओओ संजीव सिंग यांनी वाढत्या मागणीसाठी स्केलेबल पुरवठा साखळी व गुणवत्ता उत्कृष्टता महत्त्वाची असल्याचे मत व्यक्त केले. एन्ड्युरन्स टेक्नॉलॉजीजचे संजय संघाई यांनी डिजिटायझेशनद्वारे पुरवठा साखळी एकत्रीकरणाने कार्यक्षमता वाढू शकते, असे सांगितले.

परिषदेत बॅटरी तंत्रज्ञान, उद्योग ४.०, गुणवत्ता-वाढ, पुरवठा साखळी परिवर्तन यावर तज्ज्ञांच्या पॅनेल चर्चा झाल्या. स्टार्टअप व इनोव्हेशन ॲलीमध्ये ऊर्जा साठवण, ईव्ही सिस्टीम्स आणि वर्तुळ अर्थव्यवस्थेतील उपक्रम प्रदर्शित झाले.

## ७ डिसेंबर रोजी वधू-वर परिचय मेळावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ :** सध्याच्या काळात विवाह जुळविणे जिकिरीचे काम झाले असताना 'महाराष्ट्र मराठा समाज सोयरिक ग्रुप'ने सामाजिक बांधिलकी जपत विवाह जुळविण्याचे काम आरंभिले आहे. या ग्रुपने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १४ वर्षांत ३५०० लग्नगाठी बांधल्या आहेत, असे सोयरिक ग्रुपचे राज्य समन्वयक पोपटराव पाटील सपकाळ यांनी सांगितले. येत्या ७ डिसेंबर रोजी शहरात मोफत वधू वर परिचय मेळावा आयोजित केला आहे, असेही ते म्हणाले.

'मराठा समाज सोयरिक ग्रुप'च्या माध्यमातून मराठा समाजातील वधू-वरांचा मोफत परिचय मेळावा आयोजित करून लग्नगाठी बांधण्याचे कार्य हा ग्रुप कार्य करीत आहे. राज्यात मराठा समाजाचे १८० सोयरिक ग्रुप कार्यरत असून या ग्रुपच्या माध्यमातून उपवर वधू-वरांचा मोफत मेळावा आयोजित केला जात आहे. याच मेळाव्यातून अनेकांचे संसार जुळले आहेत. त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रुप अधिक सक्रिय आहे. आतापर्यंत या ग्रुपने मराठा समाजातील वधू-वरांचे ३२ परिचय मेळावे यशस्वी केले आहेत, असे सपकाळ म्हणाले. छत्रपती संभाजीनगरमध्ये रविवारी आयोजित केलेला ३३ वा मेळावा आहे.

### 'मराठा समाज सोयरिक ग्रुप'तफे आयोजन; चौदा वर्षांत बांधल्या साडेतीन हजार लग्नगाठी!-सपकाळ

या मेळाव्याची संयोजक समितीच्या वतीने जोरदार तयारी सुरू आहे. मधुरा लॉन्स येथे रविवारी हा मेळावा सकाळी ९ ते ५ या वेळेत आयोजित केला आहे. हर्सूल-जळगाव रोडवरील मधुरा लॉन्स येथे हा निःशुल्क मेळावा संपन्न होत आहे.

मेळाव्यास समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य समन्वयक पोपटराव पाटील सपकाळ, आयोजक भाऊसाहेब काळे, शिवाजी निकम (बीड), अंकुश पाटील मनगटे, प्रभाकर गायकवाड, सुभाष कोलते, सुनील देशमुख, मनोहर पाटील, प्रतिभा जगताप, आशा देवकर, अनिता पाटील (परभणी), मनोहर वडजे, श्रीमंत उकिर्डे, वसंतराव औटी, डॉ. संतोष हरणे, देवानंद गरड, जगन्नाथ परांजे, जयकिशन वाघ आहिल्यानगर, मुरली अण्णा चौधरी, बाबुराव डकले, अशोकराव गायकवाड (बीड), अशोक गायकवाड (धाराशिव), आदींनी केले आहे.

## श्री ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाने विचार शुध्द होतात : डॉ. फड

**त.भा. वृत्तसेवा**

**छ. संभाजीनगर, दि.२० :** जगाला ज्ञानाचा प्रकाश देणारी संत श्री ज्ञानेश्वर माऊलींची ज्ञानेश्वरी ही ज्ञानामृताचा सागर असून यातील एक एक अक्षर अमृत आहे. त्यामुळे श्री ज्ञानेश्वरीतील ज्ञानाला आत्मसात करणारा शुध्दाचरणी होतो. त्याचे आचार विचार आपोआप शुध्द होतात. अर्थात, मानवी जीवनाचे मानवतेचे धेय्य सहज साध्य होते, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले. संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन सोहळ्यानिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तन कार्यक्रमात फड बोलत होते.

ज्ञानदेवांना सद्गुरू या नात्याने निवृत्तीनाथांनी ज्ञानाचा अथांग सागर सर्वांसाठी खुला करण्यास परवानगी देऊन समाजावर फार मोठे उपकार केले आहेत. या उपकाराची परतफेड म्हणून का होईना, भाविकांनी श्रीज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, हरिपाठ, माऊलींचे स्फुट अभंग, श्री निवृत्तीनाथांचे अभंग प्रत्यक्षात आचरणात आणले पाहिजेत. संत जनाबाईंच्या, इर्षा, व्देष, मत्सर, क्रोध, अहंकार आदी विकारांनी भरलेल्या संसारामध्ये खऱ्या अर्थाने विश्रांती मिळवायची असेल तर संत एकनाथांच्या, स्मरतां निवृत्ती पावलो विश्रांती । संसाराची शांती झाली माझ्या ।। या म्हणण्याप्रमाणे श्री निवृत्तीनाथ व ज्ञानदेवांचे आणि त्यांच्या ग्रंथांचे स्मरण करण्याची गरज आहे.

या सप्ताहात यावर्षी श्रीमदभागवत सार, महाभारत सार, रामायण सार, हरिपाठसार, श्रीगीता ज्ञानेश्वरी सार, भक्तविजयसार, देवी महात्म्य, संत महात्म्य, ऋषी महात्म्य आणि समग्र श्री ज्ञानेश्वर माऊली सार या विषयावर दररोज तीन तास डॉ. फड यांनी प्रवचन केले.

## राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड परिमंडलाचे यश



**त.भा. वृत्तसेवा,**

**छ. संभाजीनगर, दि.२२ :** अमरावती येथे नुकत्याच झालेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड परिमंडलाच्या संघाने विविध क्रीडा प्रकारांत ९ सुवर्णपदके व ९ रौप्यपदके पटकावत उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. तिन्ही परिमंडलातील पदकविजेत्या सर्व कर्मचारी खेळाडूंचा प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने यांच्या यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

महापारेषणच्या सभागृहात झालेल्या सत्कार समारंभास छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, महापारेषणचे मुख्य अभियंता जयंत विके, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, बीना सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्यस्तरीय स्पर्धेत सांघिक खेळात व्हॉलिबॉलमध्ये राघवेंद्र कापसे, ज्ञानेश्वर गाडेकर, बाळासाहेब ढगे, रियाज शेख, हामिद सय्यद, पवन सूर्यवंशी, फेरोज तांबोळी, गजानन निलपत्रेवार, परमेश्वर जाधव, किरण वीर, मनोज साळुंके व अमोल साळुंके यांनी सुवर्णपदक पटकावले. आशिष खानापुरे, रोहन श्रीरामवार, किरण पवार, गजानन राऊत व

### ९ सुवर्ण व ९ रौप्यपदकांसह चमकदार कामगिरी

विशाल साळवे यांच्या चमूने टेबल टेनिसमध्ये सुवर्णपदक पटकावले. बॅडमिंटनमध्ये गुणवंत इप्पर, दीपक नाईकवाडे, रतनसिंग दुकानदार, सय्यद अकबर, ईश्वरसिंग टेलर यांनी रौप्यपदक पटकावले. कॅरममध्ये इक्बाल खान, सचिन केळकर, केशव लटपटे, प्रमोद चौरे व शाम वाघचौरे यांना सुवर्णपदक मिळाले. ब्रिजमध्ये दीपक माने, दिलीप पवार, सतीश गुडे, ललितादास देशपांडे, सुशील ढगे, सत्यम जयस्वाल यांना रौप्यपदक मिळाले. वैयक्तिक विजेते : गोळा फेक – श्रीकांत धोत्रे (सुवर्णपदक), भालाफेक – बालाजी कांबळे (सुवर्णपदक), बुद्धिबळ – पंकज देशमुख (सुवर्णपदक), कुस्तीच्या विविध वजनगटांत मतीन शेख यांनी सुवर्ण तर विजय जगताप, अमोल मुंगळे, बलराज अलाणे व वैभव पवार यांनी रौप्यपदक पटकावले. पॉवरलिफ्टिंगमध्ये रवी मिरगणे यांनी रौप्यपदक पटकावले. बॅडमिंटन दुहेरीत दीपक नाईकवाडे व गुणवंत इप्पर यांना रौप्यपदक मिळाले.

यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक जिवने यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांनी प्रास्ताविक केले. व्यवस्थापक (मा.सं.) डॉ.शिवाजी तिकांडे यांनी सूत्रसंचालन केले. जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी आभार मानले. कार्यक्रमास नांदेड परिमंडलाच्या उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मंजुषा पारिपेल्ली, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले, महेंद्र देशमुख, व्यवस्थापक संजय खाडे, बापू शिंदे, अविनाश चव्हाण यांच्यासह खेळाडू व कर्मचारी उपस्थित होते.

## सिपेटमध्ये बेरोजगार युवक, युवतींसाठी निवासी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि.२१ :** राज्यातील अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्गीय (ओबीसी), अपंग (पीडब्लुडी) व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या (इडब्लुएस) प्रवर्गातील युवक व युवतींकरीता प्लॅस्टिक प्रोसेसिंग तंत्रज्ञान संबधी ४ महिने कालावधीच्या नि:शुल्क रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता (निवासी) केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी एवं प्रौद्योगिकी संस्था (सिपेट) या रसायन व पेट्रोरसायन विभाग, रसायने व खत मंत्रालय भारत सरकार च्या अंतर्गत संस्थेमार्फत अर्ज मागविण्यात आले आहेत. प्रशिक्षणार्थींची निवड २४ नोव्हेंबर, २०२५ रोजी सिपेट, छत्रपती संभाजीनगर येथे मूळ कागदपत्रांची तपासणी करून व मुलाखती द्वारे करण्यात येणार आहेत. मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता कोणताही प्रवास भत्ता किंवा शुल्क दिले जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांची २६ नोव्हेंबर,२०२५ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३०४/२०२५.

अर्जदार :- १. नितीन मांगिलाल जैन, वय. ४४ वर्षे, धंदा. मजुरी, २. मनोज मांगिलाल जैन, दोघेही रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ३. मिनल मयुर चोरडीया, वय. ४० वर्षे, धंदा. मजुरी, वय. ३५ वर्षे, धंदा. घरकाम, रा. सावता नगर, सिडको, नाशिक, जि. नाशिक.

: नि. -विरुध्द- गैरअर्जदार :- कोणीही नाही.

प्रकरण :- वारस प्रमाण-पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत विजयाबाई मांगिलाल जैन हे दि. ०१/१२/२०२२ हे रोजी मौजे. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत विजयाबाई मांगिलाल जैन यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :- १९/१२/२०२५.

आज दि. १९/११/२०२५० राजा सही व विभागीय लिपीक, दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव. न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन,

**(दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव.)**

**कनिष्ठ लिपिक** **सहाय्यक अधीक्षक**

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर**

ता.गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर

कि. दि. अर्ज क्र. ७५४/२०२५

अर्जदार:- १) ज्योती भ्र. शरद दिक्षीत, वय ५१ वर्षे, धंदा गृहिणी रा. परदेशीपुरा, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर, २) सौ. वृषाली करण अग्निहोत्री, वय ३१ वर्षे धंदा गृहिणी, रा. वाकड रोड, हनुमान मंदिराच्या समोर, वाकड, पिंपरी चिंचवड पुणे, ३) गौरी पि. शरद दिक्षीत, वय २६ वर्षे, धंदा शिक्षण रा. ब्राम्हण गल्ली, गंगापुर ता.गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

प्रकरण: हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ड.श्री. ए. बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. २ व ३ या आपसांत नात्याने सख्या बहिणी असुन अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ व ३ यांची आई आहे. अर्जदार क्र. १ चे पति व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे शरद पुरुषोत्तम दिक्षीत हे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १९/०९/२०२४ रोजी मयत झालेले आहे. मयत शरद पुरुषोत्तम दिक्षीत यांना अर्जदार हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दि. २३/१२/२५ रोजीची ठेवण्यात आली आहे.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २१/११/२०२५ रोजी दिले.

**वरीष्ठ/कनिष्ठ लिपीक.** **सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय गंगापुर**

## अग्रलेख...

# सुशासनबाबू आणि विकासबाबू

बिहारच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ दहाव्यांदा घेऊन नितीशकुमार यांनी बिहारमध्येच नाही तर देशातही इतिहास घडवला आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी महाआघाडीने राजदचे तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले होते. रालोआने मात्र आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला नव्हता. विद्यमान मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात रालोआ विधानसभा निवडणूक लढवत असल्याचे भाजपाचे नेते वारंवार सांगत होते. निवडणुकीनंतर नवनिर्वाचित आमदार मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घेतील, अशी भूमिकाही भाजपा नेते मांडत होते. दुसरीकडे, नितीशकुमारच मुख्यमंत्री होतील, असा दावा जदयुचे नेते करीत होते. मतमोजणीनंतर नितीशकुमारच बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील, हे स्पष्ट झाले होते. कारण भाजपा खालोखाल ८५ जागा जदयुने जिंकल्या. जदयुला यावेळी बिहारमध्ये मिळालेले यश हे नितीशकुमारांची लोकप्रियता दर्शविणारे आहे. प्रदीर्घ काळ सत्तेवर राहूनही नितीशकुमार यांच्यावर भ्रष्टाचाराचा तसेच घराणेशाहीचा आरोप झाला नाही, ही त्यांची जमेची बाजू.

बिहारच्या जनतेसमोर यावेळी दोन पर्याय होते. पहिला म्हणजे तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वात महाआघाडीचे सरकार आणणे वा गेल्या २० वर्षांपासून बिहारमध्ये सुशासनबाबू म्हणून ओळखले जाणारे नितीशकुमार यांनाच पुन्हा संधी देणे. यात बिहारच्या सुज्ञ जनतेने नितीशकुमार यांना संधी दिली. बिहारमध्ये महाआघाडीची सत्ता आली असती आणि तेजस्वी यादव मुख्यमंत्री झाले असते, तर तेथे पुन्हा जंगलराज आले असते. लालूप्रसाद आणि राबडीदेवींच्या शासनकाळात बिहारच्या जनतेने जंगलराजचा अतिशय दाहक अनुभव घेतला आहे. बिहारमध्ये पुन्हा जंगलराज येऊ नये, तर मंगलराज यावे म्हणून तेथील जनतेने यावेळी काही उण्या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत नितीशकुमार यांच्या बाजूने कौल दिला. गुरुवारी त्यांच्या नेतृत्वात २६ सदस्यीय मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. नव्या मंत्रिमंडळात भाजपाचा वरचष्मा दिसून येतो आहे. खरे म्हणजे भाजपा आणि जदयु यांच्या आमदारांच्या संख्येत फारसा फरक नाही. त्यामुळे फार तर भाजपाला मंत्रिमंडळात जदयुच्या तुलनेत एखाददुसरी जास्त जागा मिळेल, असे वाटत होते. पण, नव्या मंत्रिमंडळात दोन उपमुख्यमंत्र्यांसह भाजपाचे चौदा मंत्री आहे, तर जदयुचे फक्त आठ. रालोआतील अन्य मित्रपक्षांना ४ जागा मिळाल्या. नितीशकुमार आपल्या मंत्रिमंडळात जास्तीत जास्त ३६ मंत्री घेऊ शकतात. म्हणजे मंत्रिमंडळात सध्या १० जागा रिक्त आहेत. याचा अर्थ नितीशकुमार भविष्यात मंत्रिमंडळाचा विस्तार करू शकतात. सुशासनबाबूंसाठी बिहार ही होम पीच असली तरी मुख्यमंत्रिपदाची दहावी कारकीर्द त्यांच्यासाठी तितकीशी सोपी नाही. त्यांच्यासमोर प्रचारदरम्यान दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचे मोठे आव्हान आहे. या आश्वासनांची खरोखर पूर्तता केली तर आधीच कमजोर असलेल्या बिहारच्या अर्थव्यवस्थेवर आणखी ताण येणार आहे. तो ताण कमी करण्याचे आव्हान नितीशकुमारांना पेलावे लागेल. २००० मध्ये नितीशकुमार यांनी पहिल्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांचा हा पहिला कार्यकाळ फक्त सात दिवसांचा म्हणजे औटघटकेचा ठरला. २००५ नंतर मात्र छोटा अपवाद वगळता गेल्या २० वर्षांपासून तेच बिहारचे मुख्यमंत्री आहेत. लालूप्रसाद आणि राबडीदेवींच्या काळात जंगलराज म्हणून बिहारची जी प्रतिमा निर्माण झाली होती, ती त्यांनी या काळात पुसून काढली. बिहारमधील गुन्हेगारी निश्चितच कमी केली. बिहारमध्ये खंडणी आणि अपहरण हा मोठा उद्योग झाला होता. खून आणि दरोड्यांसोबत महिलांवरील अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात होत होत्या. बिहारमध्ये महिलाच नाही तर कोणीच सुरक्षित नव्हते. डॉक्टर, वकील सोडा पण राज्यातील आयएएस आणि आयपीएस अधिकारीही सुरक्षित नव्हते. लालूप्रसादांच्या एका कन्येच्या विवाहात तर शोरुममधून उंची फर्निचर आणि महागड्या चारचाकी गाड्या लुटण्यात आल्या होत्या, असा आरोप झाला होता. लालूप्रसादांचे दोन साळे- साधू यादव आणि सुभाष यादव यांच्या गुंडागर्दीला तर बिहारची जनताच नाही तर पोलिस खातेही घाबरत होते. बिहारमध्ये जंगलराजचे अवशेष अद्याप शिल्लक आहेत. या जंगलराजचा शेवट करण्याचे आश्वासन नितीशकुमार यांनी दिले होते. त्यामुळे बिहारच्या जनतेने त्यांच्यावर वारंवार विश्वास ठेवला. बहुमताने निवडून दिले. त्यांनी बिहारमधील जंगलराजवर बऱ्यापैकी अंकुश आणला. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली. ज्यांनी बिहारमधील लालूप्रसादांच्या काळातील जंगलराजचा अनुभव घेतला आहे, त्यांना नितीशकुमार यांच्या काळातील मंगलराजचे महत्त्व समजेल. नितीशकुमार यांच्या कार्यकाळात बिहारमध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित होण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली गेली असली तरी त्यांच्या नेतृत्वात बिहारची अपेक्षित प्रगती अद्याप झालेली नाही. मोठमोठे उद्योगधंदे राज्यात यायला हवे होते, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण व्हायला हवा होता. तसे घडलेले नाही. बिहारच्या तरुणांना आजही रोजगारासाठी मोठ्या संख्येत आपले राज्य सोडून देशाच्या कानाकोपऱ्यात जावे लागते. मुख्यमंत्रिपदाच्या दहाव्या कार्यकाळात नितीशकुमार यांच्यासमोर राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग आणण्याचे तसेच रोजगार निर्माण करण्याचे आव्हान आहे. आधीच्या नऊ कार्यकाळांत नितीशकुमार यांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत चांगले काम केले असले तरी रोजगाराच्या क्षेत्रात त्यांना बरीच मजल पुढच्या काळात गाठावी लागेल.

त्यांचा मुख्यमंत्री म्हणून हा दहावा आणि कदाचित शेवटचा कार्यकाळ आहे. आता त्यांची प्रकृती पूर्वीसारखी त्यांना साथ देत नाही. वयाची पंचाहत्तरी त्यांनी ओलांडली आहे. चालताना त्यांना कोणाचा तरी आधार घ्यावा लागतो. स्मरणशक्तीही क्षीण झालेली आहे. त्यामुळेच भाजपा नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करायला फारशी अनुकूल नव्हती. पण बिहारच्या जनतेने तरुण तुर्क असलेल्या तेजस्वी यादव यांना नाकारत वयस्क अर्क असलेल्या नितीशकुमार यांना संधी दिली. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या नऊ कार्यकाळातील पुण्याईवर ही संधी त्यांना मिळाली आहे. ही पुण्याई एकट्या नितीशकुमार यांची नव्हती. ती भाजपाचीही होती. यावेळच्या विधानसभा निवडणुकीत रालोआने जागांचे जे द्विशतक मारले, त्याचे खरे श्रेय हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाचे आहे. लालूप्रसाद यादव बिहारमध्ये आपले राजकारण एमवाय म्हणजे मुस्लिम आणि यादव यांच्या भरोशावर करत होते. राज्यात यावेळी रालोआला मिळालेले यशही एमवाय फॅक्टरमुळे मिळालेले आहे. रालोआचा एक एमवाय फॅक्टर म्हणजे महिला आणि युवा. या दोन वर्गांनी विधानसभा निवडणुकीत रालोआला भरभरून मतदान केले. निवडणुकीपूर्वी नितीशकुमार यांच्या सरकारने महिलांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी महिला रोजगार योजना सुरू केली होती. प्रत्येक महिलेच्या बँक खात्यात दहा हजार रुपये जमा केले होते. राज्यातील जवळपास दीड कोटी महिलांना या योजनेचा फायदा मिळाला. ही योजना पुढे चालवण्याचे मोठे आव्हान नितीशकुमार यांच्यासमोर आहे. महिलांसोबत युवा वर्गासाठी रोजगार निर्माण करण्याचे दुसरे आव्हान नितीशकुमार यांच्यासोबत भाजपालाही पेलावे लागणार आहे. जदयु हा प्रादेशिक पक्ष असला तरी भाजपाचे तसे नाही. तो राष्ट्रीय पक्ष आहे. नितीशकुमार यांच्यानंतर जदयुला कदाचित फारसे राजकीय अस्तित्व उरणार नाही. भाजपा हा व्यक्तिकेंद्रित पक्ष नाही, तर विचारधारेवर चालणारा पक्ष आहे. त्यामुळे भाजपाला बिहारच्या बाबतीत दीर्घकालीन विकासाची भूमिका घ्यावीच लागणार आहे. बिहारचा आर्थिक विकास झाला तर राज्यात आपोआप उद्योगधंदे येतील आणि त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगारही निर्माण होईल. बिमारू राज्यांच्या श्रेणीतून नितीशकुमार यांनी बिहारला बाहेर काढले असले तरी ते अद्याप आर्थिकदृष्ट्या सुदृढ राज्य झाले नाही. नितीशकुमार सुशासनबाबू ठरले, पण विकासबाबू ठरलेले नाहीत. भाजपाला या दृष्टीनेही विचार करत पावले उचलावी लागणार आहेत. प्रसंगी नितीशकुमार यांना केवळ आमदारांच्या संख्याबळाचे नव्हे तर विकासाच्या रणनीतीचे पाठबळही भाजपाला द्यावे लागेल. नितीशकुमारांनी निवडणुकीची कसोटी पूर्ण केली. आता पुढच्या कसोटीच्या पूर्ततेसाठी जनता त्यांच्याएवढेच भाजपाकडेही पाहते आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# प्रांतवादाने घेतला युवकाचा बळी

**तुझी-माझी धाव आहे दातापासून दाताकडे**
**पिरॅमिडच्या दगडाखाली माझी छाती पिचली होती**
**रंगवलेली फिक्कट ममी तेव्हाच मला हंसली होती**

विंदा करंदीकरांची ही कविता. शोषित समाजाचे चित्र त्यांनी प्रतीकात्मकपणे मांडले होते. दात म्हणजे शोषण करणारे घटक. जे समाजात व्हाईट कॉलर म्हणून मिरवीत असतात. मात्र या कवितेत शोषणाची जाणीव तरी आहे. पण जगात असे अनेक समाज आहेत, त्यांना अजूनही शोषणाची जाणीव नाही. कुणीतरी आपलं शोषण करतंय हेच त्यांना ठावूक नाही. शोषण हे अनेक प्रकारचं असतं. जिहादी संस्कृती करत असलेलं बलात्काराने बाटवणारं शोषण, मानवाच्या गटाला पतीत मानून भेदभाव करणारं शोषण, भ्रष्टाचार करून लुबाडणारं शोषण, अस्मितेच्या नावाखाली जनतेला लढवून स्वतः मलई खाणारं शोषण... शोषणाची एक विशिष्ट परिभाषा करता येत नाही. मात्र एखाद्याला दुसऱ्या विरुद्ध भडकवून त्यांच्यात दंगल जुंपवणं हे देखील शोषणच आहे. अशा प्रकारचं शोषण जगभरात होत असतं. पण वर सांगितल्याप्रमाणे अनेकांना जाणीवच नसते की आपलं शोषण होत आहे. शोषण करताना ज्या समाजाचं शोषण होत असतं, त्या शोषणालाच गोड मानून स्टॉकहोल्म सिंड्रोमच्या आहारी गेल्यामुळे शोषण आनंदाने सहन करणारा समाजही अस्तित्वात असतो. त्यापैकी एक आपला मराठी समाज आहे, विशेषतः मुंबई, ठाणे, डोंबिवलीतील मराठी समाज. मराठी समाजाचा इतिहास देदीप्यमान आहे. आपल्याला ज्ञानदेवांपासून समर्थ-तुकोबांपर्यंत साहित्यिक संत लाभले. छत्रपती शिवाजी महाराजांपासून स्वा. सावरकरांपर्यंत योद्धे लाभले. बाबासाहेब आंबेडकर प्रभृती समाजसेवकही लाभले. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व्यापक दृष्टिकोन ठेवणारं नेतृत्व मराठी माणसाला लाभलं नाही. देशाचं नेतृत्व करणाऱ्या, अटकेपार झेंडा फडकवणाऱ्या मराठी माणसाच्या वैचारिक सीमा आकुंचित झाल्या. मराठी माणूस जातिवादात गुंतला तसेच तो प्रांतवादातही गुरफटत गेला. याला खतपाणी मराठीच्या नावाने राजकारण करणाऱ्या नेत्यांनी घातले. तसेच सभ्यतेचा बुरखा पांघरूण फिरणाऱ्या सो-कॉल्ड समाजसेवकांनीही यास पाठिंबा दिला. परिणामी अर्णव खैरेसारख्या जेन झी तरुणाची हत्या!

काय म्हणताय? तुम्हाला अर्णव खैरे माहिती नाही? कसा माहीत असणार? तो कोणत्याही स्टार कलाकारचा किंवा राजकीय नेत्याचा मुलगा नव्हता. 'युवा नेता' म्हणून त्याचे बॅनर कधी झळकले नव्हते किंवा कोणत्या तरी पक्षाचा झेंडा हाती घेऊन दारू पिऊन त्याने कधी तमाशा केला नव्हता. अर्णव हा १९ वर्षांचा तरुण होता. जग बघायला सुरुवात केली होती त्याने. मात्र त्याच्या घरच्यांनी जगाचं



सुंदर चित्र रंगवलं होतं, पण प्रत्यक्षात तो द्वेषाचा बळी ठरला आणि बळी घेणारे आपापल्या आलिशान बंगल्यात दोन ग्लास एकमेकांना आपटत घोट घेत आहेत. पण कसला घोट घेत आहेत? नरडीचा! मंगळवार १८ नोव्हेंबर रोजी सकाळी नेहमीप्रमाणे अर्णव खैरे अंबरनाथ-सीएसटी लोकलने कॉलेजकडे निघाला होता. त्याच्या डोळ्यांत शिक्षण पूर्ण करून सेटल होण्याची चिमणी स्वप्ने होती. मात्र प्रांतवेडाने पछाडलेले हिंस्र शिकारी या चिमण्या स्वप्नांचा वेध घेतील याची त्याला जाणीवही नव्हती. लोकलमध्ये गर्दी असल्यामुळे एका मुलाला तो हिंदीत म्हणाला, "थोडं पुढे व्हा." अचानक अस्मितेचे कैवारी, योद्धे जागे झाले. या योद्ध्यांची गंमत अशी आहे की ते झुंडीत असतात. एकट्याने जाण्याची त्यांच्यात हिंमत नसावी. झुंडीचा फायदा घेत ते सावजाचा शिकार करतात. अचानक ४५ जणांच्या टोळक्याने अर्णववर झडप घातली. त्या टोळक्याने अर्णवला विचारलं, "तू मराठी बोलत नाहीस का? मराठी बोलण्याची लाज वाटते का?" अर्णव घाबरला. तोही मराठीच होता. मराठी माणूस होता. टोळक्याने अर्णवला बुक्क्यांनी मारहाण केली. अर्णवला मारहाण होत असताना आपल्या महान परंपरेप्रमाणे लोकलमधील बघ्यांपैकी कुणीही मध्यस्थी केली नाही. कारण त्यांचं मनोरंजन होत होतं. पण त्या कोवळ्या जीवाच्या शरीरावरच नव्हे तर मनावर आघात झाला होता. हा सारा प्रकार अर्णवने त्याच्या वडिलांना फोन करून सांगितला. अर्णव खूप घाबरला होता. जग इतकं वाईट असतं की आपली काहीही चूक नसताना आपल्यासोबत गलिच्छ प्रकार घडू शकतो, हे त्याला कळून चुकलं होतं. अर्णव खैरे घरी आला खरा. पण त्याने दार लावून घेतलं. ते अस्मितेचे कैरावी त्याचा पाठलाग करून त्याला मारतील या भीतीने तो ग्रासला होता. अखेर पंख्याला लटकून त्याने जीव दिला. आत्महत्या केली. पण ही आत्महत्या नव्हती तर हत्या होती. ही हत्या केवळ त्या टोळक्याने, त्या झुंडीने केली नाही. तर ही हत्या केली आहे त्या झुंडीला प्रेरणा देणाऱ्यांनी. प्रांतवादाचं विष मराठी माणसाच्या मनात कालवणाऱ्यांनी... नुकताच एका ३ वर्षांच्या लहान मुलीवर बलात्कार करून तिचा खून करण्यात आला. अर्णवसोबत झाला तो सुद्धा बलात्कारच होता, मनावर केलेला बलात्कार. चिमुरडीवर बलात्कार करणाऱ्यामध्ये आणि त्या झुंडीमध्ये कोणताच भेद नाही. मानसिकताही तीच आहे.

आता अस्मितेच्या नावाने बोंबा मारणारे नेते, सो-कॉल्ड प्राध्यापक, समाजसेवक बाहेर पडणार नाहीत. त्यांचे कार्यकर्ते सोशल मीडियावर अपशब्दांची फुले उधळतील आणि रात्री पार्ट्या करत झिंगतील. पण अर्णव खैरेसारख्या अनेक मराठी मुलांचे काय? अर्णव खैरेसारखी लहान मुलं या अस्मितेचं राजकारण करणाऱ्यांसाठी बळी देण्याचे साधन आहेत. या राजकारणात अर्णव हलाल झाला. अशा अनेक मराठी मुलांच्या थडग्यांवर या लोकांनी महाल उभारले आहेत. हा रोख केवळ राजकीय नेत्यांवर नसून असे अनेक लोक जे सभ्यतेचा, प्राध्यापकीचा, मराठी अस्मितेचा चेहरा घेऊन फिरतात आणि समाजात द्वेष पसरवतात त्यांच्यावर देखील आहे. मराठी मुलांना उकसवणाऱ्या लोकांवर कारवाई झाली पाहिजे की नको? लोकलमधील ते जीव घेणारे लोक सापडतीलच. पण त्यांना प्रवृत्त करणाऱ्यांवर कारवाई होईल का? यांच्या राजकारणासाठी मराठी माणसांनी किती वर्षे हौतात्म्य पत्करायचं? यांची मुलं आपल्याला सुट-बुट घालून आलिशान गाड्यांतून फिरताना दिसतात ना? मग सामान्य मराठी माणसांच्या मुलांचं काय? अर्णव गेला, त्याच्यावर हल्ला करणाऱ्या टोळक्यांनाही अटक होईल. कारवाई होईल, शिक्षा होईल. म्हणजे हल्ला करणाऱ्या मराठी माणसांचेही नुकसानच झाले. "मग फायदा कोणाचा झाला?" "कोणाचा फायदा झाला?" हा प्रश्न जेव्हा तुम्हाला पडेल तेव्हा खऱ्या अर्थाने तुम्ही जागृत झालेले असाल. तोपर्यंत,

**चीनच्या त्या भींतीवरती बुरूजागणिक भूत आहे**
**दगडाच्याही अंगावरती पिळणुकीची लुत आहे**
**मला एक कळले आहे सुवर्णाच्या रथात बसून**
**सत्य येथून पळले आहे प्रत्येकाच्या छातीवरती**
**चाकोरीची खूण आहे जिकडे तिकडे मुकी धडे**
**इतिहासाला गेले तडे त्यांत नवीन काय घडे**
**मराठी माणसा, तुझी-माझी धाव आहे**
**दातापासून दाताकडे.**

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल फेकरीकर**

# आज नागपूर, उद्या कारपूर

लोकसंख्येचा स्फोट होत असल्याचे लक्षात येताच भारत सरकारने नसबंदीचा कार्यक्रम युद्धपातळीवर राबविणे सुरू केला होता. आजही एक किंवा दोन अपत्यानंतर नसबंदीसाठी दाम्पत्यांना आग्रह केला जातो. आता अशाच स्वरूपाची नसबंदीरूपी नियंत्रण वाहन विकण्यावर येणे काळाची गरज आहे. लोकांची गरज आहे म्हणून ते वाहने खरेदी करतात. पण वाहन ठेवायला जागाच नाही तरीही त्यांची खरेदी ही लोकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. नागपुरातील ही गंभीर समस्या आज अनेकांना जाणवू लागली आहे. म्हणूनच की काय आज नागपूर, उद्या कारपूर आणि परवा गुन्हेपूर व्हायला वेळ लागणार नाही. ही चिंता केवळ माझीच नाही तर पार्किंग समस्येवरून उद्भवलेल्या वादानंतर संबंधित पीडितांनाही जाणवू लागली आहे.

नागपूरची लोकसंख्या ३५ लाखांपेक्षा जास्त आहे. तर वाहनांची संख्या २४ लाखांपेक्षा जास्त झाली आहे. नागपुरात एमएच ३१, एमएच ४० आणि एमएच ४९ अशा स्वरूपात वाहनांची नोंदणी केली जाते. २०२२ मध्ये प्रतिदिन १९७ नवीन वाहनांची विक्री होत होती. २०२३ मध्ये ती संख्या २०३ पर्यंत गेली. २०२४ मध्ये ती वाढून २५० झाली. आता २०२५ मध्ये तो आकडा ५०० पेक्षा जास्त झाला आहे. मान्य आहे की, लोकांकडे खूप पैसा जमा झाला आहे. याचा अर्थ त्यांनी धडाक्यात वाहनांचीच खरेदी करावी काय? याचे उत्तर नकारात्मकच द्यावे लागेल. 'खिशात नाही दमडी आणि खायला हवी कोंबडी' ही बाब माणसाला पदोपदी लागू पडते. मग कार किंवा इतर वाहनांची खरेदी करताना जागेचा मुद्दा लागू पडू नये का? पार्किंगचा मुद्दा प्रचंड गंभीर आहे. टोलेजंग घर असले तरी त्यात वाहने ठेवायला जागाच नसते. मग ती मंडळी दुसऱ्यांच्या घरापुढे वाहने ठेवतात. तिथेही जागा मिळाली नाही तर रस्त्यावर ठेवून मोकळे होतात. त्या वाहनांमुळे अपघात झाले तरी त्यांना त्याचे सोयरसुतक नसते. अशा लोकांच्या विरोधात संताप व्यक्त करण्यासाठी काही युवकांनी कारच्या काचा फोडण्याचा उद्योग सुरू केला होता. पण अशाने ही समस्या सुटणार नाही. कुणाचे नुकसान करून समस्येवर उपाय निघत नसतो. पार्किंगची जागा दाखवा नंतरच कार खरेदी करता येईल अशा स्वरूपाची कडक अंमलबजावणी व्हायला हवी. शिवाय सार्वजनिक वाहतूक व्यवस्था तगडी करायला हवी. सहजतेने चोवीस तास जाणे येणे होईल अशी माफक व्यवस्था झाल्यास कोणीही वैयक्तिक कारला प्राधान्य देणार नाही. पण त्याकडे होणारे दुर्लक्ष आज नागपूरला गुन्हेपूरकडे ढकलत आहे. जेव्हा वाहतूक पोलिस 'नो पार्किंग'मध्ये लावलेल्या वाहनांच्या विरोधात कारवाई करतात तेव्हा होणाऱ्या वादविवादांचा एकदा प्रत्यक्ष अनुभव घ्या. संपूर्ण शहरात असे अनेक वाद होतात अन् लोकांना दंड भरून स्वतःची सुटका करून घ्यावी लागते. ज्यांना ठेच लागली ते काही दिवसांपुरते सुधरतात पण पुन्हा काही दिवसांनी 'ये रे माझ्या मागल्या'प्रमाणे वागतात. विस्कळीत झालेली वाहतूक आणि कार पार्किंग व्यवस्था या समस्या नागपुरात कुठल्याही क्षणी उद्रेक करू शकतात. त्याचे वेळीच समूळ उच्चाटन झाले तरच बरे होईल. अन्यथा झालेला उद्रेक शांत करणे प्रशासनासाठी वेगळी डोकेदुखी ठरू शकते. वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी अनेक उपक्रम सुरू असतात. पण त्यातून फायदा दिसतच नाही. उलट सुशिक्षित लोकांकडून कायद्याचे उल्लंघन वाढले आहे. कार खरेदीतही हीच मंडळी अग्रेसर आहेत. त्यांना रोखणे फार कठीण असले तरी अशक्य नाही. ऑटोमोबाईल उद्योगाची भरभराट व्हायला हवी. पण त्याकरिता लोकांचे जीव घेऊन किंवा लोकांना त्रास देता कामा नये. तसा विचार करता वाहन खरेदी करणाऱ्यांनीच आपली स्थिती समजून घ्यायला हवी. कायदा जरी केला तरी तो पालन करणाऱ्यांनी त्याचा मनापासून स्वीकार केल्यास लाभ होतो. अन्यथा कायदाही निरर्थक ठरतो. म्हणूनच कायद्याने आणि नागरिकांनी आपले नागपूर भविष्यात गुन्हेपूर होणार नाही याची काळजी घ्यावी. शेवटी, भारतात नागपूर आज हृदयस्थळ म्हणून गणले जाते. या हृदयस्थळाला जपणे सर्वांचे कर्तव्य आहे. तेव्हा आज नागपूर, उद्या कारपूर आणि परवा गुन्हेपूर होण्यापूर्वी शासनाने लोकसहभागातून यावर रामबाण तोडगा काढणे काळाची गरज आहे. जेव्हा हे होईल तेव्हाच नागपूर अधिक सुंदर होईल, नाही का?

९८२२४६८६६०

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# लाचारीची परिसीमा!

१९४८ ते १९६० या कालावधीत महाराष्ट्राने अनेक चढउतार बघितले. अनेक संकटे झेललीत. अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार राहिला. मुंबई महाराष्ट्राला जोडण्यासाठी मराठी माणसांनी केलेला एल्गार हा देखील महाराष्ट्राच्या इतिहासाच्या पुस्तकातील एक सुवर्ण पान आहे. मुंबई महाराष्ट्राला हवी या मागणीसाठी अडून बसलेल्या मराठी आंदोलकांनी वेळप्रसंगी प्राणांची आहुती दिली. "डंके की चोट पर..." ताठ मानेने, स्वाभिमानाने ती मिळविली. पण कधीही लाचारी पत्करली नाही. मात्र, याच मुंबईला आम्ही मिळवलं, असा दावा करणाऱ्या उबाठा गटाची सत्तेसाठी चाललेली लाचारी बघितल्यावर, खरंच यांनी मुंबई मिळविण्यासाठी प्रयत्न केले असतील का? असा प्रश्न निर्माण होतो. कारण सत्तेसाठी कुठल्याही पातळीवर जाण्याचा यांचा मागील काळातला एकूणच प्रवास बघितल्यास "लाचारीची परिसीमा" काय असते, याची प्रचीती येते.

काल-परवा उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी, एकनाथ शिंदेंच्या दिल्ली दौऱ्यावर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीवर "अलिकडे तुम्ही बघितलं असाल, बाबा मला वाचवा करायला एक जण गेला दिल्लीला", अशा शब्दांत खिल्ली उडविली. एवढ्यावर ते थांबले नाहीत तर, पुढे ते म्हणाले, "योग्यवेळी चांगला गुरू मिळाला असता तर अशी लाचारीची वेळच आली नसती..." मुळात १९८० पासून २०२२ पर्यंत एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांच्या शिवसेनेत होते. त्यांचे पहिले गुरू हे आनंद दिघे आणि श्रद्धास्थान स्व. बाळासाहेब ठाकरे होते. या दोघांच्या मार्गदर्शनात एकनाथ शिंदे नावाचा हिरा महाराष्ट्राच्या राजकारणात उदयास आला. आणि सध्या अवघ्या ३ वर्षांपासून त्यांचा भाजपासोबत स्वतंत्र सहवास आहे. अर्थात यापूर्वी ते भाजपाच्या सहवासात नव्हते अशातला भाग नाही. कारण १९८९ साली भाजपा आणि शिवसेना युती झाली. त्यावेळी एकनाथ शिंदे हे शिवसेनेत कार्यरत होते. १९९७ साली ते शिवसेनेचे नगरसेवक होते. नंतर ठाणे महानगर पालिकेचे सभापती झाले. २००४ मध्ये बाळासाहेबांनी शिंदेंना विधानसभा लढविण्यासाठी निवडले. त्यानंतर ते सातत्याने २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ असे सलग शिवसेनेच्या चिन्हावर भाजपा सोबतच्या युतीत विजयी होत आले. एवढेच नव्हे तर, २०१४ ला ते देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रिमंडळात मंत्रीदेखील होते. त्यामुळे शिंदे आता आता अलिकडे भाजपाच्या सहवासात



आले आहेत. त्यामुळे ते दिल्लीला मुजरा करायला जात आहेत, असा कुणाचा समज असल्यास त्याच्या राजकीय विवेकावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. त्याही पलीकडे जाऊन गंभीर विषय तर वेगळाच राहिला... १९८० ते २०१२ या काळात एकनाथ शिंदे यांचे गुरू-मार्गदर्शक राहिलेले आनंद दिघे असोत किंवा मग दस्तुरखुद्द बाळासाहेब ठाकरे असोत हे योग्य गुरू नव्हते असे उद्धव ठाकरेंना म्हणायचे आहे का? उद्धव ठाकरे हे ज्यांच्या वारसामुळे नेते आणि पक्षप्रमुख आहेत, त्या बाळासाहेब ठाकरेंनी आपल्या मार्गदर्शनात एकनाथ शिंदेंना नगरसेवकापासून तर विधानसभा सदस्यापर्यंत पोहचविले. त्यांचे मार्गदर्शन योग्य नव्हते किंवा त्यांची निवड योग्य नव्हती असा संदेश उद्धव ठाकरेंना या महाराष्ट्राला द्यायचा आहे का? आणि मुळात ३२-३५ वर्षे ज्यांच्या सहवासात आणि मार्गदर्शनात एकाला तयार केले, त्यांच्या संस्कारात तो संघटनेत वाढला, ते बाळासाहेबांचे संस्कार चुकीचे होते, असा अर्थबोध यातून काढावा असे उद्धव यांना अपेक्षित आहे का? हे एकदाचं उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केलं पाहिजे.

बरं देशातल्या कोणत्याही राज्यातला उपमुख्यमंत्री दिल्लीला गेला आणि देशाच्या गृहमंत्र्यांना भेटला तर तो आपल्या राज्याच्या हिताच्या दृष्टीने काही गोष्टींचे सहकार्य मागायला जाऊ शकत नाही? तो मुजरा करायलाच जाणार कशावरून? हा उद्धव ठाकरेंना ती लाचारी आणि मुजरा करायला गेला असं वाटू शकतं... कारण ठाकरे जेव्हा महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री होते, तेव्हा ते आपलं मुख्यमंत्रिपद कायम ठेवायला दिल्लीच्या आपल्या राजमातांना मुजरा करायला जायचे. एवढेच नव्हे तर, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीवेळी मला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करा, अशी भीक मागायला देखील दोन ते तीन वेळा आपल्या युवराजासोबत दिल्लीला गेले होते. ते या नेत्यांकडून त्या नेत्यांकडे चपला झिजवताना अवघ्या महाराष्ट्राने बघितले. पण रिकाम्या हाताने परतावे लागले होते. मग उद्धवजींनी केलेल्या वक्तव्याच्या त्याच न्यायाने हा सगळा घटनाक्रम बघितल्यास याला देखील लाचारी म्हणायची की त्यांच्या शब्दकोशात काही वेगळा शब्द आहे?

बरं बाळासाहेब होते तेव्हा त्यांना भेटायला राष्ट्रीय नेते त्यांच्या निवासस्थानी यायचे. आता काँग्रेसचा कोणताही नेता उद्धव ठाकरेंना भेटायला त्यांच्या निवासस्थानी जात नाही. राहुल गांधी बाळासाहेबांना श्रद्धांजली, आदरांजली वाहत नाही, स्वातंत्र्यवीर सावरकर आमचे श्रद्धास्थान आहे म्हणणारे, त्याच सावरकारांचा वारंवार अवमान करणाऱ्या राहुल गांधींच्या मांडीला मांडी लावून बसतात, हिंदुत्व आम्ही सोडलं नाही म्हणताना, हिंदू धर्म कोरोना आहे, कॅन्सर आहे म्हणाऱ्यांसोबत सलगी करतात, आता आता अलिकडे मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा कपोलकल्पित दावा करत, भाजपासोबत न जाण्याचे आवाहन करताना, ज्या काँग्रेसने खऱ्या अर्थाने मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न केला, मराठी बांधवांवर बेछूट गोळीबार केला, त्यांच्यासोबत लोकसभा, विधानसभेत तर आघाडी केलीच, मात्र मुंबई महापालिका निवडणुकीत पुन्हा आघाडी करायला लोटांगण घालताना हे दिसत आहेत. या दोगल्या भूमिकेमुळे यांचा खरा चेहरा उघडा पडला आहे. यावेळी मुंबई महापालिका निवडणूक काँग्रेसने स्वबळावर लढविण्याचे जाहीर करून टाकले आणि ठाकरे, त्यांचे शिलेदार, त्यांच्या घरचे मुखपत्र हे आघाडी करा, आघाडी करा अशी काँग्रेसकडे रोज भीक मागताना दिसत आहेत. या सगळ्याला काय म्हणायचे... स्वाभिमान की लाचारी!... "लाचारी में हर व्यक्ति सिधाही होता है, असली चेहरा देखना हो तो उसे कुछ वक्त ताकत, सत्ता, शौहरत सौपकर देखो..." ही शायरी उद्धव ठाकरेंच्याबाबतीत तंतोतंत लागू झालीय्... त्यामुळे मुंबई, महाराष्ट्राच्या जनतेला यांचा खरा चेहरा आता दिसू लागल्याने, यांनी कितीही मुखवटे बदलवले तरी, लाचारीशिवाय दुसरे काहीही पदरात पडणार नाही, एवढे मात्र निश्चित!

९२७०३३३८८६

## आजचे संघगीत-९०

शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५

### समाज पुरुषा होई जागृत

समाज पुरुषा होई जागृत ॥धृ.॥

या पृथ्वीच्या पावन पृष्ठी व्यक्तिहूनी अतिश्रेष्ठ समष्टी ।
तूच समष्टी तुझीच सृष्टी तूच कासया होसी निद्रित? ॥१॥

हिंदू तितुका तुझाच अवयव संघशक्ति तव समता सौष्ठव ।
विशालता ती जगास दाखव गती घेउ दे तुझा धर्मरथ ॥२॥

वेद श्रुति हे तव मुखमंडळ इतिहासाची तुला प्रभावळ ।
अजिंक्य केवळ तुझे तपोबळ भीति घालशिल तूच भयाप्रत ॥३॥

तू निजल्याने निजली नीती योद्ध्याहून दो बळी सारथी ।
भारतीयता नुरे भारती ऊठ शाप क्रोधे तू परमत ॥४॥

मोहमूढ तू रणात अर्जुन गीता सांगे माधव गर्जुन ।
कार्य करी तू फळास वर्जुन कुरुतीर्थासी करण्या पूनित ॥५॥

उरी शूरता करात गीता चाल विशाला उभवित माथा ।
अवघ्या विश्वा आण आर्यता ठायी ठायी ध्वजा उभारित ॥६॥

उघड आपुले सहस्र लोचन उठव मानसी निद्रित 'मी' पण ।
टाक तमासी तेजे जाळुन आत्मोद्धारा घेई नव व्रत ॥७॥

### भटक्या कुत्र्यांच्या नियोजनासाठी योग्य पद्धत असावी

नागपूर शहरातील भटक्या कुत्र्यांची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. अलिकडेच घडलेली एक घटना तर नागरिकांच्या सुरक्षेबाबत अनेक प्रश्न उपस्थित करते. भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी आमच्या भागात २० ते २५ वयोगटातील काही तरुण ३-४ दुचाकींवर डबलसीट बसून, हातात जाळी घेऊन, मोठ्या वेगात कुत्र्यांचा पाठलाग करत असल्याचे दिसले. ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत धोकादायक व असंवेदनशील होती. कुत्र्यांना जाळ्यात अडकवण्याच्या प्रयत्नात ती प्रचंड घाबरली होती, चवताळून इकडे-तिकडे पळू लागली. त्यांच्यामागे मुलांनी भरधाव वेगात गाड्या चालवल्याने अशा परिस्थितीत अपघाताची शक्यता असते. कारण रस्त्याने ये-जा करणाऱ्यांना यातील काहीच माहिती नव्हती. घाबरलेले कुत्रे कुणावर हल्ला करण्याची भीती असते, तसेच ते कोणाच्या घरात घुसण्याचा धोका असतो. जग आज कितीही प्रगत झाले असले, तरी अशा अघोरी, जीवघेण्या व अव्यवस्थित पद्धती आजही वापरात असल्याचे चित्र अतिशय खेदजनक आहे. महानगरपालिकेने अशा मोहिमांबद्दल कोणतीही पूर्वकल्पना नागरिकांना न देणे, तसेच प्रशिक्षित पथकाऐवजी अशा असुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे हे नक्कीच प्रश्न निर्माण करणारे आहे. नागपूरसारख्या महानगरात असे बेछूट, धोकादायक प्रकार घडत असल्यास नागरिकांमध्ये भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे. मनपा प्रशासनाने तातडीने या विषयावर अभ्यास करून वैज्ञानिक, सुरक्षित व मानवीय उपाययोजना राबवाव्यात, ही सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

## वाचक पत्रे

### निरोगी व्यक्तींवर अनावश्यक शस्त्रक्रिया!

जीवन वाचवणारा, जीवन जगण्याची आशा देणारा आणि मानवतेची सेवा करणारा सर्वोच्च असा व्यवसाय करणाऱ्यांना देवमाणूस असे म्हटले जाते. व्यक्ती मरणासन्न स्थितीत असताना त्याच्यावर योग्य उपचार करून रुग्णाला जीवनदान देणारे डॉक्टर देवमाणूसच आहेत. असे असताना वैद्यकीय क्षेत्रातील गैरप्रकार जेव्हा उघडकीस येतात, तेव्हा मनात भीती निर्माण होते. नुकताच गुजरात येथे झालेला एक गंभीर गैरप्रकार उघडकीस आला आहे. येथील 'जेसीसी हार्ट इन्स्टिट्यूट'ने चक्क ८०० निरोगी व्यक्तीच्या हृदयाची शस्त्रक्रिया करून त्यांच्या हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीत स्टेंट म्हणजे नळी घातली आहे. हे कशासाठी केले, तर 'प्रधानमंत्री जनआरोग्य योजने'तून मिळणारे पैसे कमावण्यासाठी म्हणजेच स्वतःचे खिसे भरण्यासाठी निरोगी व्यक्तींच्या शरीराशी असा नीच खेळ खेळला गेला. २-३ नव्हे, तर शेकडो व्यक्तींवर अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या प्रकरणामुळे चाचणी करणारे, अहवाल देणारे, तसेच संपूर्ण वैद्यकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आतापर्यंत डॉक्टरांनी अनावश्यक चाचण्या करण्यास सांगितल्या, महागडी औषधे दिली, अतिरिक्त शुल्क आकारले आणि कमी अधिक प्रमाणात अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यास सांगितले, अशा घटना घडत होत्या. मात्र गुजरातमधील घटनेने वैद्यकीय क्षेत्राला काळिमा फासला आहे. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची समिती नेमणे, त्यांनी शंकास्पद रुग्णालयांना अचानक भेटी देणे, तेथील व्यवस्था आणि चाचण्यांची कागदपत्रे तपासणे अत्यावश्यक आहे. तसेच वैद्यकीय शिक्षणात प्रवेश देताना केवळ परीक्षेतील गुण हा एकमेव निकष न ठेवता, नीतिमत्ता आणि चांगले आचरण हे निकषही असायला हवेत.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नूतन विद्यालयाच्या २१०० विद्यार्थ्यांकडून २० हजार चौ. फुटांची 'वोट फॉर सेलू' साखळी

सेलू,/प्रतिनिधी- नूतन विद्यालय, सेलू येथे स्वीप मतदार जागृतीअभियानांतर्गत आज (दि.२१) एक अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम पार पडला. नूतन विद्यालयातील तब्बल २१०० विद्यार्थ्यांनी वीस हजार स्केअर फुट व्यापणारी 'वोट फॉर सेलू' अशी भव्य मानवी साखळी उभी करून लोकशाही बळकटीकरणाचा सामुदायिक संदेश दिला.

सेलू नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५च्या पार्श्वभूमीवर आयोजित या उपक्रमाचे मार्गदर्शन उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी उदयसिंह चव्हाण, तहसीलदार डॉ. शिवाजी मगर, नगरपरिषद मुख्याधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तुकाराम मगर आदी मान्यवरांनी केले.

या सर्जनशील उपक्रमाची संकल्पना नूतन विद्यालयाच्या चित्रकला विभाग प्रमुख किशोर कटारे आणि क्रीडा शिक्षक प्रशांत नाईक यांची होती. नूतनच्या मैदानावर २१०० विद्यार्थी कलात्मक पद्धतीने मांडून वोट फॉर सेलू हा प्रभावी संदेश साकारण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस.एम. लोया होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, सहसचिव जयप्रकाश बिहाणी, प्रभारी मुख्याध्यापक किरण देशपांडे, पर्यवेक्षक रोहीदास मोगल, शंकर बोधनापोड, उपमुख्याध्यापक परसराम कपाटे, मुख्याध्यापक उल्हास पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी तुकाराम मगर यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगत लोकशाही प्रक्रियेतील सक्रीय सहभागाचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना मतदानाची शपथ किर्ती राऊत यांनी देऊन उपक्रमात उत्साह निर्माण केला.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळू बुधवंत यांनी केले. सुत्रसंचलन डॉ. काशिनाथ पल्लेवाड यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सुरेश हिवाळे यांनी केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी फुलसिंग गावित, सच्चिदानंद डाखोरे, संजय भुमकर, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त...

### मराठवाडा हायस्कूलच्या दोन विद्यार्थ्यांची 'विद्यार्थी विज्ञान मंथन' परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूलमधील सातवी 'ब'चे विद्यार्थी अद्वैत जीवन जोशी आणि अथर्व पवन जाधव या दोन विद्यार्थ्यांनी 'विद्यार्थी विज्ञान मंथन परीक्षेत' उल्लेखनीय यश संपादन केले असून त्यांची या परिक्षेकरीता राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे.

या दोन्ही विद्यार्थ्यांचे हे यश शाळेचा, पालकांचा तसेच शिक्षकांचा अभिमान वाढवणारे ठरले आहे. विज्ञान विषयावरील आवड, सातत्यपूर्ण परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर त्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे. शाळेच्या व्यवस्थापनाच्यावतीने दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### चिमुकलीच्या निर्घृण हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ मानवतात व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त बंद : तहसील कार्यालयावर जोरदार मोर्चा

**परभणी,/प्रतिनिधी :** मालेगांव तालुक्यातील डोंगराळे येथील चार वर्षीय चिमुकलीवर नराधमाने केलेल्या अमानुष अत्याचारासह तीच्या निर्घृण खून प्रकरणाच्या निषेधार्थ शनिवारी मानवत शहरातील व्यापाऱ्यांनी बाजारपेठा बंद ठेवून तीव्र निषेध नोंदविला.

डोंगराळे येथील ही घटना अत्यंत भयावह आहे. या घटनेने सर्वदूर दहशतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे या घटनेतील आरोपीस कठोर शिक्षा करावी, अशी मागणी करीत संतप्त व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवून निषेध नोंदविला. दरम्यान, शहरातील नागरीक, व्यापारी, सामाजिक संस्था, अन्य प्रतिष्ठानांसह राजकीय पक्षातील स्थानिक नेतेमंडळींसह कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयावर जोरदार जनआक्रोश मोर्चाही काढला. त्या मोर्चाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

### हैदराबाद विभागात लाईन ब्लॉक; काही गाड्या रद्द, अंशतः रद्द, तर काहींचे पुनर्नियोजन व नियमन

**परभणी,/प्रतिनिधी :** हैदराबाद विभागातील रेल्वे रुळ दुरुस्ती आणि इतर देखरेखीची कामे हाती घेतल्यामुळे विभागात लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कामांच्या पार्श्वभूमीवर काही गाड्या पूर्णपणे रद्द करण्यात आल्या असून काही गाड्या अंशतः रद्द, तसेच काही गाड्यांचे पुनर्नियोजन आणि नियमन करण्यात आले आहे. प्रवाशांनी या बदलांची नोंद घेऊन प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

लाईन ब्लॉकदरम्यान ०३, ०४, ०५, ०६, ०८ आणि ०९ जानेवारी २०२६ रोजी निजामाबाद-हु.स. नांदेड या मार्गावरील ७७६४५ आणि ७७६४६ या गाड्या पूर्णतः रद्द राहणार आहेत. तसेच ११४०९ दौंड-निजामाबाद (०२, ०३, ०४, ०५, ०७, ०८ जानेवारी) ही गाडी मुदखेड-निजामाबाददरम्यान रद्द राहील, तर ११४१३ निजामाबाद-पंढरपूर (०३, ०४, ०५, ०६, ०८, ०९ जानेवारी) ही गाडी निजामाबाद-मुदखेडदरम्यान बंद राहणार आहे.

दरम्यान, ७७६०६ हुजुर साहीब नांदेड-मेडचल (०३, ०४, ०५, ०६, ०८, ०९ जानेवारी) ही गाडी १८० मिनिटे, २०८११ विशाखापट्टणम-हु.स. नांदेड (०३ जानेवारी) ६० मिनिटे, १७०५७ मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-लिंगमपल्ली (०३ जानेवारी) ५० मिनिटे, आणि १७६४१ काचिगुडा-नरखेर (०४ जानेवारी) ५० मिनिटे उशिरा सुटणार आहे.

तसेच नियमनांतर्गत १७६०६ भगत की कोठी-काचिगुडा (०२ जानेवारी) ही गाडी नांदेड विभागात १२० मिनिटे, तर काचिगुडा-भगत की कोठी (०६ व ०७ जानेवारी) ही गाडी ५० मिनिटे विलंबाने चालवली जाणार आहे. १७६६१ काचिगुडा-नागरसोल (०४ जानेवारी) ही गाडी काचिगुडा-जंगमपेटदरम्यान १२० मिनिटे, तर नागरसोल-काचिगुडा (०८ व ०९ जानेवारी) या मार्गावर हीच गाडी ६० मिनिटे उशिराने नियमनात चालवली जाणार आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली.

### पूर्णेत नगराध्यक्षासाठी १४ उमेदवार तर नगरसेवक पदासाठी ११२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात

**पूर्णा,/प्रतिनिधी :** पूर्णा नगरपालिकेत नगराध्यक्षपदाकरीता प्रमुख राजकीय पक्षांच्या चौघांसह एकूण १४ उमेदवार तर २३ नगरसेवक पदाकरीता ११२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहेत.

नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठीच्या या निवडणूकीकरीता शुक्रवारी उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतीम मुदतीत मोठ्या प्रमाणावर उमेदवारी अर्ज मागे घेतले जातील, असे अपेक्षित होते. परंतु, नगराध्यक्षपदासाठी छाननी प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी केवळ दोन उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे निवडणूक रिंगणात आता १४ उमेदवार शिल्लक राहीले आहेत. तर ११ प्रभागातील सदस्य पदाच्या २३ जागांकरीता छाननी प्रक्रियेत एकूण २१४ उमेदवारी अर्ज पात्र ठरले होते. अर्ज माघारीच्या अंतीम मुदतीत आज शुक्रवारी २९ इच्छुकांनी रिंगणातून माघार घेतली. आता प्रत्यक्ष लढतीत ११२ उमेदवारी अर्ज शिल्लक राहीले आहेत.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू -** शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

### जिंतूरात मतदान जनजागृतीसाठी भव्य व आकर्षक रांगोळी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** मतदान जनजागृती अभियान अंतर्गत निवडणूक कार्यासाठी नेमलेल्या कर्मचारी मतदारांना जागृत करण्यासाठी मतदान जनजागृतीसाठी जिल्हा परिषद प्रशाला कौसडी या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या कला शिक्षक ज्ञानेश्वर बर्वे यांनी भव्य व आकर्षक रांगोळी काढली. या रांगोळीच्या माध्यमातून उपस्थित असणाऱ्या सर्व मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क समजावून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपस्थित सर्वांनी सदर कलाकृतीचे विशेष कौतुक केले. या रांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृतीच्या ज्ञानेश्वर बर्वे यांच्या कार्याचा उपविभागीय अधिकारी सेलू तथा निवडणूक निर्णय अधिकारी जिंतूर नगर परिषद शैलेश लाहोटी, तहसीलदार जिंतूर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेश सरवदे, मुख्याधिकारी उमेश ढाकणे, उपमुख्याधिकारी अनिल समिंद्रे, नायब तहसीलदार निवडणूक सुग्रीव मुंढे, मिडिया पथक प्रमुख नायब तहसीलदार प्रशांत राखे, गटशिक्षणाधिकारी तथा मतदान जनजागृती पथक प्रमुख त्र्यंबक पोले यांनी गुणगौरव व विशेष सन्मान केला.

## पालम येथे श्री सदगुरू बाळकृष्ण महाराज संस्थान येथे अखंड हरिनाम सप्ताह

**शांतीलाल शर्मा**
**पालम,/प्रतिनिधी:** पालम पवित्र चातुर्मास पर्वकाळ समाप्ती पर्वकाळ निमित्त पालम येथील श्री सदगुरू बाळकृष्ण महाराज संस्थान येथे ज्ञानेश्वरी पारायण,श्री विष्णू याग तथा श्री मद भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा संपन्न.



प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी श्री सदगुरू बाळकृष्ण महाराज यांच्या १२२ व्या पुण्यतिथी पर्वकाळ निमित्ताने वे.शा.सं.गुरु श्री धोंडू महाराज यांच्या आशीर्वादाने तथा वे. शा.सं गुरुवर्य श्री वामन महाराज इनामदार पालमकर यांच्या मार्गदर्शनाखाली तथा विधिवत धार्मिक कार्यक्रम ग्रामजोशी गोसेवक श्री देविदासगुरु विश्वनाथदेव जोशी पालमकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१४ नोव्हेंबर २०२५ शुक्रवार पासून दि.२१ नोव्हेंबर २०२५ शुक्रवार पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले यामध्ये भजने, कीर्तने, पारायणे चातुर्मास पर्वकाळ निमित्त भागवत सांगता तथा यज्ञ अन्नदान इत्यादी कार्यक्रम संपन्न झाले दैनंदिन पहाटे ४ ते ६ काकडा भजन सकाळी ०८ ते १० ज्ञानेश्वरी पारायण व भागवत पठण सकाळी १० ते १२ गाथा भजन दुपारी ०३ ते ०५ भागवत कथा व प्रवचन सायंकाळी ०५ ते ०६ धूप आरती सायंकाळी ०६ ते ०७ नित्य उपासना रात्री ०९ ते ११ हरी कीर्तन तथा हरी जागर याप्रमाणे कार्यक्रम संपन्न करण्यात आला यावेळी सागा प्रमुख श्री मंचक महाराज गोळेगावकर हभप.श्री दत्ता महाराज पिंपरीकर ज्ञानेश्वरी पारायण प्रमुख ह.भ.प श्री शाहुराव महाराज पत्की कीर्तन वीणाप्रमुख श्री ह.भ.प अण्णा महाराज सरफराजपूरकर ह.भ.प श्री नामदेव गुरुजी कुलकर्णी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला तथा यावेळी ह.भ.प श्री राजेंद्रदास महाराज कौडगावकर ह.भ.प श्री बापदेव महाराज बेळगावकर ह.भ.प गुरुवर्य श्री नारायण महाराज पालमकर ह.भ.प.श्री शंकर महाराज घटांग्रेकर ह.भ.प श्री एकनाथ महाराज पाळेकर ह.भ.प विजयानंद महाराज सुपेकर ह.भ.प.गुरुवर्य श्री वामन महाराज इनामदार पालमकर ह.भ.प.श्री पद्माकर महाराज वाजुस्कर यांच्या वतीने कीर्तन सेवा करण्यात आली. दि.२१नोव्हेंबर २०२५ रोजी श्री सदगुरू यांच्या समाधी स्थळी श्रीक्षेत्र जांभूळबेट येथे महाअभिषेक व्यास पूजन तथा पालम येथे सद्गुरूच्या पालखी सोहळ्याची भव्य मिरवणूक काढण्यात आली व सर्व भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. गुरुवर्य श्री रंगनाथ वामन महाराज इनामदार पालमकर तथा गुरुवर्य श्री सखाराम महाराज इनामदार पालमकर यांच्या मार्गदर्शना खाली पवित्र चातुर्मास पर्वकाळ समाप्ती निमित्त श्री सदगुरू बाळकृष्ण महाराज पुण्यतिथी सोहळा संपन्न झाला.

## आडगाव सर्कलमध्ये बिरसा मुंडा जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**जिंतूर,/प्रतिनिधी-** आडगाव सर्कलमध्ये बिरसा मुंडा जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनाशैक्षणिकसाहित्याचेवाटप जिंतूर प्रतिनिधी - तालुक्यातील आडगाव सर्कल मध्ये भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त आडगाव सर्कलमधील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये डॉ. देवराव कऱ्हाळे व त्यांच्या सहपत्नी सौ मीरा देवराव कऱ्हाळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



आडगाव, आडगाव तांडा, देवसडी, टाकळखोपा, श्रीरामवाडी, भुसकवडी, दगडवाडी, सोरजा, सोरजा तांडा, मोहखेड, मोहखेड तांडा आणि चीतणरवाडी या गावांतील शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. समाजभानातून शिक्षणास हातभार लावणारी ही पहल शिक्षक व पालकांनी कौतुकास्पद असल्याचे सांगितले. शैक्षणिक साहित्य वितरणावेळी मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. यावेळी डॉ कऱ्हाळे यांनी आपल्या मनोगतमध्ये सांगितले की मी ज्या समाजात, खेड्यात प्राथमिक शिक्षण घेतले तेथील छोट्या छोट्या खेड्यातील, तांड्या तील हलाकीच्या परिस्थितीची मला जाण आहे असेही ते म्हणाले.



## पायल वाघमारे हिचे अभिनंदन

**पालम,/प्रतिनिधी-** के.के. एम महाविद्यालय बीकॉम तृतीय वर्षाची विध्यार्थीनी पायल वाघमारे यांचा संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य उच्य व तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्येमाने सुरु केलेला करिअर कट्टाच्या माध्यमातून विविध उपक्रम महाराष्ट्र शासन घेते. त्याचाच भागू म्हूणन करिअर कट्टा महाराष्ट्र राज्य यांनी आयोजित केलेल्या करिअर कट्टयाचे महत्व आणि फायदे या विषयावर रिल्स स्पर्धा घेण्यात आलेली होती. या स्पर्धेत पायल वाघमारे यांनी परभणी जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळाला या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. विजयकुमार कत्रुवार,प्राचार्य डॉ.भास्कर मुंडे, करिअर कट्टा समन्वयक डॉ.पंडित लांडगे, प्रा विनोद हिबारे यांनी त्यांचा सत्कार केला आणि शुभेच्छा दिल्या.

## पाथरीच्या नगराध्यक्ष पदाकरीता तूल्यबळ अशी तिरंगी लढत होणार : भाजपचे शिवराज नाईक अपक्ष म्हणून रिंगणात : स्थानिक नेतेमंडळींची प्रतिष्ठा पणास

**पाथरी,/प्रतिनिधी :** पाथरी नगरपालिकेच्या नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या तिरंगी लढतीत ज्येष्ठ नेते माजी आमदार तथा काँग्रेसचे विद्यमान जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्राणी, शिवसेना शिंदे गटाचे नेते सईद खान व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे विद्यमान आमदार तथा जिल्हाध्यक्ष राजेश विटेकर यांची राजकीय प्रतिष्ठा पणास लागणार आहे.

नगराध्यक्षपदाकरीता काँग्रेसकडून जूनेद खान दुर्राणी, राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून मोईज अन्सारी व शिवसेना शिंदे गटाकडून आसिफ खान हे तीघे प्रबळ उमेदवार रिंगणात कायम आहेत. या तीघा उमेदवारांच्या पाठीशी त्यांचे गॉडफादर कंबर कसून मोर्चेबांधणी करुन बसले आहेत. त्यामुळेच नगराध्यक्षपदाची निवडणूक या इच्छुकां व्यतिरिक्त या गॉडफादर नेतेमंडळींकरीता प्रतिष्ठेची ठरणार आहे. तर भारतीय जनता पार्टीचे स्थानिक नेते शिवराज नाईक यांनी अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज कायम राखून लक्ष वेधून घेतले आहे.

नगराध्यक्षपदाकरीता या पालिकेत मोठ्या प्रमाणावर उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. परंतु, छाननी प्रक्रियेतून १५ उमेदवारांचे २२ उमेदवारी अर्ज पात्र ठरले. तर सदस्यपदाकरीता ४० उमेदवारांचे १३८ अर्ज पात्र ठरले होते. शुक्रवारी उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतीम मुदतीत नगराध्यक्षपदासाठी ५ उमेदवारांचे १२ अर्ज व सदस्य पदासाठी ४० उमेदवारांचे ५७ उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले. त्यामुळे नगराध्यक्षपदासाठी १० तर सदस्यपदाच्या २३ जागांकरीता ८१ उमेदवार निवडणूकीत शिल्लक राहीले आहेत.

भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक इच्छुकांनी मोठ्या प्रमाणावर उमेदवारी अर्ज दाखल केले होते. परंतु, जिल्ह्यातील नेतेमंडळींनी एबी फॉर्म उपलब्ध केले नाहीत. त्यामुळे हे इच्छुक अपक्ष म्हणून रिंगणात उतरतील, अशी चिन्हे होती. या नाराज मंडळींनी काल पत्रकार परिषद घेऊन बंडाचा झेंडा फडकविण्याचा संकल्प सोडला. त्याप्रमाणे शिवराज नाईक यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम राखला.

दरम्यान, अनेक वर्षापासून या पालिकेत दुरंगी लढती झाल्या. त्या साऱ्या लढती एकतर्फी झाल्या. ज्येष्ठ नेते दुर्राणी यांनी तब्बल २५ वर्षांपासून सातत्याने प्रत्येक निवडणूकीत एकतर्फी असे यश मिळवून आपले निर्विवाद वर्चस्व कायम राखले. परंतु, या निवडणूकीत शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने चांगलेच आव्हान उभे केले आहे. त्यातच बहुजन समाज पार्टी, वंचित बहुजन आघाडी व एमआयएमचेही उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरलेले आहेत.

## मी पाहिलेला दादा... प्रभाकर दादा पाटील वाघीकर

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी-** मी पाहिलेले दादा असे म्हणता की कबुतराला गरुडाचे पंख लावता येतील पण गगन भरारीचे वेड रक्तात सायला हवं....!

मा प्रभाकर दादा पाटील वाघीकर यांचा जन्म वाघी बोबडे येथील सर्वसामान्य शेतकरी कुटूंबात झाला दि १४ जानेवारी १९६४ रोजी झाला त्यांचे माध्यमिक शिक्षण नूतन विद्यालय परभणी येथे झाले व १९८३ रोजी त्याचा विवाह बेबीनंदा यांच्याशी झाला .

जसे म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरुषांच्या मागे स्त्री चा हात असतो त्या प्रमाणे सौ बेबीनंदा ताई यांनी दादा च्या प्रत्येक सुख दुःखात मोठे पाठबळ दिले व त्यांच्या त्यानां सर्व कौटुंबिक जबाबदारी पार पाडून राजकारण असो वा समाजकारंन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे त्यांना पाठबळ दिले। व आई वाडीलाप्रमाणे त्यांच्या सौभाग्यवतीसह चिरंजीवाणी सुद्धा त्यांच्या शैक्षणिक कार्यामध्ये योगदान देऊन त्यांना प्रोत्साहन दिले व दादाची सर्व सामान्य माणसाच्या सुखदुःख शी नाळ जोडूली गेली व कोणच्या लेकीचं लग्न असो व दवाखान्यात असो सर्वांच्या हाकेला ओ



देऊन मदत करणारा माणूस त्यांनी समाजकारणाची कास धरून त्यांनी वाघी बोबडे येथील सरपंच पदाची धुरा १९९०साली सांभाळली व तेथून पुढे सतत२५ वर्षे त्यांच्या कडे राहिले राजकारण करत असतांना या परिसरातील दिंन दलीत , अल्पसंख्याक, मागासवर्गीय यांच्या अनेक समस्या सोडवण्यासाठी आहोरात्र प्रयत्न केले व १९९७ ला कौसडी सर्कल मधून जिल्हा परिषदेवर निवडून आले व उपाध्यक्ष झाले व त्यांच्या कार्यकाळात रस्ते, शाळा खोल्या, समाज मंदिर,पाणीपुरवठा अशी अनेक कामे त्यांच्या हातून झाली व राजकारण करतांना सर्वसामान्य माणसाच्या दैनिक प्रश्न सोडवण्यासाठी सतत प्रयत्न करतो समाजाच्या विकासा साठी जो व्यक्ती झटतो तो खरा राजकारणी होय।

हाच दृष्टीकोण डोळ्यासमोर ठेवून १९९९ साली आपल्या मातोश्री च्या नावाने सौ भागीरथीबाई पाटील सेवाभावी संस्थेची स्थापना केली व च्या माध्यमातून आपल्या परिसरातील मुलींच्या शिक्षण नां साठी दूर गावी जावे लागते म्हणून त्यांनी आपल्या गावात प्रभुकृपा माध्यमिक व उच्च मध्यमिक विद्यालयाची २००६ पासून सुरुवात केली २००६ ला ८वी ते १० वी चे वर्ग सुवात करून त्या पाठोपाठ २००९ रोजी ५वी ते ७वी चे वर्ग त्याच बरोबर उच्च माध्यमिक म्हणजे ११ वी (कला शाखा) १२ (कला शाखा) सुरू करून आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडचण दूर केले व आज आपल्या गावात ५ वी ते १२वी पर्यंत शैक्षणिक सुविधा चालू आहे .आणि म्हणूनच दादा न सारखे अजातशत्रू म्हणजे कुणीही शत्रू नसलेले माझ्यासाठी बालपणापासून एक आदर्श व्यक्तीमत्व सतत दुसऱ्यांसाठी झिजत राहिल्या मुळे त्यांच्या विषयी आज लिहू वाटले ......!

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नगर पालिकेवर भाजपचीच सत्ता येणार– आ. तान्हाजी मुटकुळे

## निवडणुक नियोजन बैठकीत पदाधिकारी, कार्यकर्त्यांना मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

हिंगोली शहराचा विकास भारतीय जनता पक्षाच्या काळातच झाला आहे. रस्ते, नाल्या, जलेश्वर तलाव सौंदर्यीकरण, सांस्कृतीक सभागृह आदी विकास कामे पूर्ण झाली आहेत. भविष्यात उर्वरित विकास कामे आम्ही करणार आहोतच. हिंगोलीकरांचा भाजपवर ठाम विश्वास असून भाजपच्या प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच उमदेवारांनी जोमाने कामाला लागावे. कोणत्याही धमक्या, आमिषाला बळी न पडता काम करावे. नगर पालिकेवर भाजपचीच सत्ता येणार असा ठाम विश्वास निवडणुक प्रमुख तथा आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी बैठकीत व्यक्त केला.

भाजपच्यावतीने नगरपालिका निवडणुक नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, सरचिटणीस उमेश नागरे, महिला जिल्हाध्यक्षा उज्ज्वला तांभाळे, सुनीताताई मुळे, क्रिष्णा रूहीटीया, उपाध्यक्ष संजय ढोके, के के शिंदे, नारायण खेडकर, विजय धाकतोडे, रजनीश पुरोहीत, पवन उपाध्याय, रजनी पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी शिवसेनेवर जोरदार टिका केली. शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांनी कळमनुरीसह तालुक्यात एकही विकास काम केले नाही. अवैध धंद्यांच्या माध्यमातून केवळ पैसा कमवायचा एकमेव उद्देश त्यांचा आहे. विकास कामे आणि शिवसेना आ. बांगर यांचा काहीही संबंध नाही. आज कळमनुरी शहराची काय अवस्था आहे सर्वांनाच माहीत आहे. हिंगोलीतही शिवसेना तीच पध्दत अवलंबविण्याचा प्रयत्न करीत आहे परंतु हिंगोलीची जनता सुज्ञ आहे. हिंगोलीकरांनी नेहमीच भाजपला साथ दिली आहे. माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्या काळातच हिंगोलीत विकास कामे झाली आहेत. हे सर्व जनतेला माहीत आहे. कितीही इव्हेंट केले तरी शिवसेनेला आणि महाविकास आघाडीला जनता त्यांची जागा दाखवेल.

भाजपच्या प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उमेदवारांनी कोणत्याही धमक्यांना, आमिषाला बळी न पडता आपण शहरात केलेल्या विकास कामांची माहीती द्यावी तसेच घरोघरी जाऊन केंद्र व राज्य सरकारने राबविलेल्या योजनांची माहीती द्यावी. घरोघरी संपर्क अभियान राबवून मतदारांशी संपर्कात रहावे असे आवाहन यावेळी आ. मुटकुळे यांनी केले.

या बैठकीत प्रभागनिहाय रणनीती, प्रचाराचा आराखडा, मतदार संपर्क मोहिमेची रूपरेषा आणि पुढील काम काजाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि संघटनेची बांधिलकी पाहून आगामी निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी साध्य होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. आगामी निवडणूक शांततेत, शिस्तीने व संघटितरीत्या लढवण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करावे, जनतेशी सकारात्मक संवाद साधावा आणि पक्षाची विकासाभिमुख भूमिका स्पष्टपणे पोहोचवावी, असे आवाहन प्रमुख पदाधिकाऱ्यांनी केले. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सर्व जिल्हा पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, सर्व मोर्चाचे अध्यक्ष, उमेदवार, माजी नगरसेवक, बुथ प्रमुख आदींची उपस्थिती होती.

# हिंगोली नगर पालिकेवर मशालच पेटणार– खा. आष्टीकर

## हिंगोलीत महाविकास आघाडीची भव्य रॅली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

महायुतीतील भाजप आणि शिवसेना एकमेकांवर कुरघोडी करीत आहे. जनता अवैध धंद्यांना आणि दहशहतीला कंटाळली आहे. त्यामुळे येत्या नगर पालिका निवडणुकीत हिंगोलीतील जनतेसमोर महाविकास आघाडी हा एकमेव पर्याय असून नगर पालिकेवर मशालच पेटणार असल्याचा विश्वास हिंगोलीचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी व्यक्त केला आहे.

हिंगोली नगर पालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून शुक्रवारी महाविकास आघाडीच्या उमेदवार अर्चना श्रीराम भिसे यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडीच्यावतीने शहरातून भव्य रॅली काढून शक्तीप्रदर्शन करण्यात आले. यावेळी सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे, जिल्हा प्रमुख गोपू पाटील, वसीम देशमुख, डॉ रमेश शिंदे, शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने महाविकास आघाडीतील पदाधिकारी, माजी आमदार तसेच कार्यकर्ते सहभागी झाले होते. शहरातील प्रमुख मार्गावरून ही रॅली काढण्यात आली.

यावेळी बोलतांना खा नागेश पाटील आष्टीकर म्हणाले की, हिंगोली जिल्ह्यातील जनता दहशतीला आणि अवैध धंद्यांना कंटाळली आहे. त्यांच्याकडे कुठलाही विकासाचा अजेंडा नाही. या रॅलीमध्ये लोक स्वयंस्फूर्तपणे सहभागी झाले आहेत. त्यामुळे जनता महाविकास आघाडीचे उमेदवार अर्चना श्रीराम भिसे यांच्याकडे उत्तम पर्याय म्हणून पाहत आहे. या लोकांशी टक्कर देण्यासाठी विनायक भिसे यांच्या माध्यमातून आम्ही नगराध्यक्षपदाचा उमेदवार उभा केला आहे. निश्चितच यावेळी जनतेचा प्रतिसाद पाहता नगर पालिकेवर उबाठा शिवसेनेची मशाल पेटणार आहे. महाविकास आघाडीचा विजय होणार आहे.

यावेळी सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे यांनी बोलतांना सांगितले की, भाजप आणि शिंदेसेना एकमेकांवर कुरघोडी करीत आहे. जनता हे सर्व उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. अवैध धंदे आणि दहशतीला थांबवायचे असेल तर जनतेला महाविकास आघाडी हाच एकमेव पर्याय आहे. यांचेकडे विकासाचा कोणताही मुद्दा नाही. अजूनही पिण्याचा पाण्याचा प्रश्न हिंगोलीकरांचा सुटलेला नाही.

# भारतीय जनता पक्षाचा डोअर टु डोअर प्रचार सुरू



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

हिंगोली नगर पालिका निवडणुकीला अवघे काही दिवस शिल्लक असल्यामुळे आता भाजपच्या नेत्यांसह उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शनिवारी सकाळपासूनच डोअर टू डोअर भेटी देत प्रचार सुरू केला आहे.

हिंगोली भारतीय जनता पक्षाच्यावतीने निवडणुक नियोजन बैठकीनंतर भाजपने आता थेट मतदारांना प्रत्यक्ष भेटी देत त्यांच्याशी सकारात्मक संवाद साधण्यास सुरूवात केली आहे. शनिवारी सकाळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, नारायण खेडकर, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, सरचिटणीस उमेश नागरे, उपाध्यक्ष संजय ढोके, दिपक निमोदीया, सुभाष लदनिया यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शहरातील व्यापारी तसेच नागरिकांच्या भेटी घेतल्या. यावेळी त्यांच्या अडीअडचणी ऐकून घेवून त्यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर प्रभाग क्रमांक पाच व प्रभाग क्रमांक एक जिजामाता नगर आदी भागांमध्ये घरोघरी भेट देत मतदारांशी संवाद साधला. यावेळी नागरिकांनीही उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.




**हिंगोली– मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे तीन वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेचा निषेध सुवर्णकार व सराफा समाजाच्यावतीने येथील गांधी चौकात कँडल मार्च काढून करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने चिमुकल्या मुलींसह युवती, महिला सहभागी झाल्या होत्या. आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणीचे फलक हातात दिसत होते– छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### कामगारांच्या मुलांची शिष्यवृती मिळेना

औंढा नागनाथ– तालुक्यातील बांधकाम कामगारांच्या मुलांची शिष्यवृती मागील दोन वर्षापासून बांधकाम कामगार विभागाच्या हलगर्जीपणामुळे मिळत नसल्याने कामगारांमध्ये तीव्र संताव व्यक्त करण्यात येत आहे. कामगारांनी मागील वर्षी शिष्यवृतीसाठी मागील वर्षी अर्ज दाखल करूनही अद्याप त्यांना शिष्यवृती मिळाली नाही तर यावर्षीची अवस्था तशीच आहे. कामगारांना बांधकाम कामगार विभागात यासाठी चकरा माराव्या लागत आहे. कधी अर्ज रिणीव करण्यासाठी तसेच कधी नवीन कार्ड बनविण्यासाठी वर्षभर थांबावे लागत आहे. शासनाने ऑनलाईन सर्व प्रक्रिया केली आहे परंतु कामगारांच्या पाल्यांना दोन–दोन वर्षे शिष्यवृतीसाठी ताटकळत रहावे लागत आहे. यावर कामगार मंत्र्यांनी उपाययोजना करावी व गोरगरीब पात्र कामगारांच्या पाल्यांना तत्काळ शिष्यवृती द्यावी अशी मागणी कामगारांमधून होत आहे.

### २८ नोव्हेंबरपासून गुरू चरित्र पारायण



हिंगोली– शहरातील मंगळवारा भागातील श्री दत्त मंदिरात दि २८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबरपर्यंत गुरूचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ ते १० यावेळेत पारायण होणार असून पंचपदी, त्रिपदी आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. या कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन गुरू चरित्र पारायण समितीचे श्रीराम शार्दुल, संजय मेथेकर, चैतन्य देशपांडे यांनी केले आहे.

### नागनाथ संस्थानकडून आनंद दवे यांचा सत्कार



हिंगोली– ब्राम्हण महासंघाचे आनंद दवे यांनी नुकतीच औंढा नागनाथ येथील श्री नागनाथ मंदिरास भेट दिली तसेच दर्शन घेतले. यावेळी संस्थानकडून त्यांना नागनाथाची प्रतिमा भेट देत सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थानचे पदाधिकारी, विश्वस्त उपस्थित होते.

# आदर्शमध्ये एनसीसी दिवस उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

येथील आदर्श महाविद्यालयात उत्साहाच्या वातावरणात एनसीसी दिन साजरा करण्यात आला. एनसीसी निदेशालय व ५२ महाराष्ट्र एनसीसी बटालियन नांदेड यांच्या सूचनेनुसार एनसीसी दिनी परेडचे व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. विलासराव आघाव, प्रमुख पाहुणे म्हणून माजी एनसीसी अधिकारी मेजर पंढरीनाथ घुगे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.प्रा. आनंद भट्ट, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. प्रा. सचिन हटकर डॉ. प्रा. विलास पवार एनसीसी विभागप्रमुख प्रा. डॉ.सोपानदेव खरात व एनसीसी छात्रसैनिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविकात एनसीसीचे मुख्य उद्दिष्ट शिस्त, नेतृत्व, राष्ट्रीय एकात्मता आणि सेवा भावना विकसित करणे हे आहे. एनसीसी दिनी देशभरात परेड चे सामाजिक उपक्रम, स्वच्छता मोहिमा, रक्तदान शिबिरे आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सोपानदेव खरात यांनी केले. एनसीसी प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, वेळेचे नियोजन, आत्म विश्वास व देशसेवेची भावना दृढ होते. एकता आणि शिस्त एनसीसी हे घोषवाक्य नुसार राष्ट्रीय व सामाजिक विकास आणि आपत्ती व्यवस्थापनात एनसीसीचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे असे मार्गदर्शनपर मनोगत प्राचार्य डॉ.विलास आघाव यांनी व्यक्त केले. सामूहिक एनसीसी गाण एनसीसीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने सादर केले.

# जिल्ह्यात १४०६ समाज कंटकांवर पोलिसांची प्रतिबंधात्मक कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

जिल्ह्यातील तीनही नगर पालिकेच्या पार्श्वभूमीवर पोलिस विभागाने समाज कंटकांवर कारवाईचा फास आवळला असून मागील दोन महिन्याच्या कालावधीत तब्बल १४०६ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. सदर मोहीम यापुढेही सुरूच राहणार असल्याचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले. हिंगोली, कळमनुरी तसेच वसमत या तीन नगर पालिका निवडणुकीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. तर आगामी काळात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका देखील होणार आहेत. सध्या सुरू असलेल्या नगरपालिका निवडणुका शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस विभाग सतर्क झाले आहे. जिल्ह्यात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली तेरा पोलिस ठाण्यांमधून पथके स्थापन करण्यात आली आहेत. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या समाजकंटकांवर कारवाई करण्याच्या सुचना या पथकाला देण्यात आल्या आहेत. याशिवाय शस्त्र बाळगणाऱ्यांची जबाबदारी गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे यांच्या पथकाकडे देण्यात आली आहे. याशिवाय हिंगोली शहरात पोलिस निरीक्षक संदीप मोदे, जमादार अशोक धामणे, संजय मार्के, गणेश लेकुळे, गणेश वाबळे, संतोष करे, शेख मुजीब यांचे पथक कार्यरत करण्यात आले आहे.

नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आतापर्यंत १४०६ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये हिंगोली शहर पोलिस ठाण्याच्या पथकाने २३१, कळमनुरी १२९, वसमत शहर १२६, हिंगोली ग्रामीण २२४, औंढा नागनाथ १२०, सेनगाव १२०, नर्सी ८४, गोरेगाव ३३, बासंबा ८७, वसमत ग्रामीण ३८, कुरूंदा ५५, हट्टा ६६, आखाडा बाळापूर ९३ जणांवर पोलिस विभागाने प्रतिबंधात्मक कारवाई केली.

# सांदीपनीच्या सक्षम रणवीरला राज्यस्तरीय जिम्नमॅस्टीक स्पर्धेत रौप्यपदक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय नागपूर व भारतीय शालेय खेळ महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय राज्यस्तरीय ॲक्रोबॅटिक जिम्नॅस्टिक्स क्रीडा स्पर्धा तालुका क्रीडा संकुल, कोराडी (नागपूर) येथे १८ ते २१ डिसेंबर २०२५ दरम्यान उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेत लातूर विभागातील नांदेडच्या सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनिलनगर तरोडा बु. येथील जिम्नॅस्टिक्स खेळाडू सक्षम रणवीर याने १९ वर्षाखालील मिक्स पेअर गटात उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांकाचे रौप्य पदक पटकावले. पंधरा वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर नांदेडच्या इतिहासात प्रथमच ॲक्रोबॅटिक जिम्नॅस्टिक्समध्ये विजयाचा तुरा रोवण्याचा मान सक्षम रणवीरला मिळाला आहे. यापूर्वी सांदीपनीचे खेळाडू आकाश लक्ष्मन बागडे व नोबल भाऊराव राठोड यांनी सलग तीन वर्षे राज्यस्तरीय पदकांची परंपरा कायम ठेवली होती.

सक्षम रणवीर हा किरण स्पोर्टस् अकॅडमी, नांदेड येथे लक्ष्मन फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली लहानपणापासून जिम्नॅस्टिक्सचा कसून सराव करीत आहे. त्यांच्या मेहनतीला आणि शिस्तबद्ध प्रशिक्षणाला या यशाने योग्य न्याय मिळाला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे संचालक सुनिल राठोड, सहसंचालक मुकूल राठोड, प्राचार्या क्रांती कुलकर्णी, उपप्राचार्या हरप्रीत कौर, सल्लागार केदार शर्मा, प्रशासक मारोती मेखाले, क्रीडा शिक्षक भाऊराव राठोड तसेच सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सत्कार करीत त्याचे अभिनंदन केले.

# हिंगोली नगर पालिकेत तिरंगी लढतीचे संकेत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

हिंगोली नगर पालिका निवडणुकीत भाजपच्या नीता बांगर, शिंदेसेनेच्या रेखा श्रीराम बांगर तर महाविकास आघाडीच्या अर्चना श्रीराम भिसे यांच्यात तिरंगी लढत होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

हिंगोली नगर पालिकेच्या निवडणुक प्रचाराला वेग आला असून भारतीय जनता पक्षाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे आणि माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांनी प्रचाराची धुरा हाती घेतली असून नियोजनबध्दपणे प्रभाग निहाय बैठका, भेटीगाठी तसेच मतदारांशी संवाद साधण्यात येत आहे. दुसरीकडे कळमनुरीचे शिंदेसेनेचे आ. संतोष बांगर, माजी सभापती श्रीराम बांगर, युवा सेना जिल्हाप्रमुख राम कदम यांनी प्रचारात चुरस निर्माण केली आहे. महाविकास आघाडीकडून एकमेव उमेदवार अर्चना श्रीराम भिसे या असल्यामुळे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच उबाठा शिवसेनेच्यावतीने प्रचारात आघाडी घेतांना दिसत आहे. काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, उपनगराध्यक्ष शेख निहाल हाजी ईस्माईलयांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर खिंडार पडल्यामुळे या दोन्ही पक्षांची अवस्था हिंगोलीत केविलवाणी झाली आहे.

सकाळपासूनच सर्वच राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच उमेदवार आता मते मागण्यांसाठी दारोदार फिरतांना दिसत आहेत. भाजप विकासाच्या मुद्द्यावर निवडणुक रिंगणात उतरली आहे. सभा, कॉर्नर बैठका आणि भेटीवर सध्या भर देण्यात येत असून एकमेकांवर आरोप–प्रत्यारोप करण्याची स्पर्धा सर्व पक्षांमध्ये लागली आहे.

# नांदेडमध्ये काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीमध्ये फाटाफूट

**भा वृतसेवा**
**ांदेड, दि. २२ नोव्हेंबर-**

नांदेडमध्ये काँग्रेस आणि वंचित बहुजन ाघाडीच्या नव्या राजकीय समीकरणाचा दय होण्यापूर्वीच त्याचा ११ दिवसातच अस्त ाल्याची बाब पुढे आली आहे. जिल्ह्यात १२ गरपालिका आणि एका नगरपंचायतीसाठी ाँग्रेस पक्ष आणि वंचित बहुजन आघाडीने क्त्र येण्याची घोषणा ११ नोव्हेंबर रोजी केली ोती. मात्र या निवडणुकीत जागा वाटपावरून बनसल्याने ११ दिवसातच काँग्रेस आणि वंचित हुजन आघाडी यांच्यात फाटाफूट झाली आहे. ा संदर्भात वंचित बहुजन आघाडीने नेमलेल्या नवडणूक समितीचे समन्वयक अविनाश ोसीकर यांनी आता यासंदर्भात खुलासा रण्यासाठी रविवारी पत्रकार परिषद बोलावली ाहे. त्या पत्रकार परिषदेत अधिक खुलासा ला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यात धर्मांध शक्तींना ाखण्यासाठी काँग्रेस पक्ष आणि वंचित बहुजन ाघाडी जिल्ह्यातील बारा नगरपालिका आणि का नगरपंचायतीची निवडणूक एकत्र लढवणार शी घोषणा ११ नोव्हेंबर रोजी काँग्रेसचे ासदार प्रा. रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष नुमंत पाटील बेटमोगरेकर, राजेश पावडे, हानगराध्यक्ष अब्दुल सत्तार आणि वंचित हुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारुख हमद, महासचिव श्याम कांबळे, जिल्हाध्यक्ष ावा नरंगले या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत रण्यात आली होती. या घोषणेनंतर नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात सकारात्मक पडसाद उमटले होते. ही आघाडी गरजेची होती, असेही सांगण्यात आले होते; मात्र अकरा दिवसातच या आघाडीला छेद बसला आहे. 'सम समान सन्मान' या धोरणाला छेद दिल्यामुळे ही आघाडी प्रत्यक्ष निवडणुकीपर्यंतही टिकू शकली नाही, हे स्पष्ट झाले आहे.

वंचित बहुजन आघाडीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी एक निवडणूक समिती गठीत केली आहे. या समितीमध्ये नांदेड जिल्ह्यातील सहा जणांचा समावेश आहे. या समितीमध्ये समन्वयक म्हणून अविनाश भोसीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी शनिवारी समाजमाध्यमावरील एका पोस्टमध्ये काँग्रेस आणि वंचितची आघाडी तुटली असल्याचे स्पष्ट केले आहे. यासंदर्भात रविवारी होणाऱ्या एका पत्रकार परिषदेत अधिक माहिती दिली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीच्या निवडणूक समितीतील सदस्य फारूक अहमद, श्याम कांबळे यांनी या बाबींना बाबीला दुजोरा दिला आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यात नव्या राजकीय समीकरणाचा उदय होण्यापूर्वीच अस्त झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या राजकीय आघाडीमध्ये बिघाड होण्याचे प्रमुख कारण हे जागावाटप ठरले आहे. नगरपालिकांच्या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे वंचित बहुजन आघाडीला जागा न सोडल्यामुळे काँग्रेस सोबतची ही आघाडी फिस्कटली असल्याचे सांगितले जात आहे.

# पाचोंदा दुहेरी हत्याकांडापुर्वी आरोपींनी पानोळाच्या महिलेला लुटल्याचे उघड

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २२ नोव्हेंबर-**

माहूर तालुक्यातील पाचुंदा येथे २० नोव्हेंबर रोजी दोन महिलांचा खून करून त्यांच्या अंगावरील दागिने लुटल्या गेले, दरम्यान दुसऱ्याच दिवशी या हत्याकांडातील दोन आरोपींना स्थागुशा नांदेडच्या पथकाने पकडून माहूर पोलीस ठाण्याच्या हवाली केले. आणि आज या हत्याकांडातील आरोपींच्या दुष्कृत्याचा आणखी एक कारनामा माहूर पोलिसांनी उघड केला असून, पानोळा येथील एका महिलेस आठ दिवसाआधी जीवे मारण्याचा प्रयत्न करून अंगावरील सोन्याचांदीचे दागिने लुटण्याचा थरारक प्रकार घडला होता, या प्रकरणाच्या चौकशी अंतर्गत सदरील महिलेस आज २२ रोजी माहूर पोलीस ठाण्यात आणून अटक केलेल्या आरोपीची ओळख पटविली असता महिलेने तात्काळ त्या आरोपींना ओळखून याच आरोपींनी मला मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न करत सोने चांदी नगदी रक्कम लुटून नेल्याचा कबुली जबाब दिल्याने सदरील आरोपींवर माहूर पोलीस ठाण्यात दि.२२ रोजी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती या घटनेचा तपास करीत असलेले सपोनि शरद घोडके यांनी दिली आहे.

मौजे पानोळा येथील सौ सुशीला विष्णू राठोड वय ५० वर्ष ह्या दिनांक ०९ नोव्हेंबर रोजी दुपारी ०२.०० वाजताचे सुमारास आपल्या स्वतः च्या शेतामध्ये कापूस वेचणीसाठी गेल्या होत्या. कापुस वेचत असतांना दुपारी ०३.३० वाजताचे सुमारास एक अनोळखी इसमाने चाकुचा धाक दाखवुन ७५ हजार ६०० रुपयांचे सोन्याचे व चांदीचे दागिने चाकुचा धाक दाखवुन जबरीने धमकावून काढुन घेतले. घटना कोणास सांगितली तर तुला जिवानिशी मारुन टाकतो. म्हणुन धमकी दिल्याची फिर्याद दिल्याने अटक केलेल्या आरोपींना त्या महिलेस दाखवून ओळख परेड केली असता महिलेने तात्काळ त्या आरोपींना ओळखले. त्या दोघा विरुद्ध पुन्हा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.सदरील कारवाई पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप,जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, तपास पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली शरद घोडके हे करीत आहेत. याकामी पोहेका गजानन चौधरी, सत्यपाल मडावी, सारिका राठोड, शिल्पा राठोड हे मदत करीत आहेत.

# पराभवाच्या धस्क्याने राष्ट्रवादीच्या उमेदवाराकडुन मारहाण; संतोष कुलकर्णी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २२ नोव्हेंबर-**

विरोधातील प्रतिस्पर्धी उमेदवाराला आपला पराजय दिसुन येत असल्याने माझ्यावर जीवघेणा हल्याचा पुर्ववैमस्यातुन पुर्वनियोजीत कट रचुन विरोधी पक्षाने गंभीर जखमी करण्याच्या उद्देशाने मला मारहाण केली,त्यांना त्यांचा पराजय दिसत असल्याने यातुनच त्यांनी मला मारहाण केली आहे,परंतु ही निवडणुक जनतेने हातात घेतली असुन विरोधकांची दादागिरी जनता मतपेटीतुन दाखवुन देईल असा विश्वास मराठवाडा जनहित पार्टी प्रणित बिलोली शहरविकास आघाडीचे उमेदवार संतोष कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

गेल्या १५ वर्षापासुन बिलोली नगरपरिषदेवर एकहाती सत्ता गाजवलेल्या अन् विकासाच्या दृष्टीने एकपाऊल पुढे असणाऱ्या माजी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांचा सुरु असलेल्या सार्वत्रिक निवडणुकीचा वाढता जणाधार पाहुन विरोधकांच्या पायाखालची वाळु घसरली आहे.निवडणुकीत पराभव होण्याच्या धस्क्याने नुकतेच राष्ट्रवादी गटात प्रवास केलेले इंद्रजीत तुडमे व त्यांच्या साथिदाराने संग्नमत करुन संतोष कुलकर्णी यांना जबर मारहाण केली होती,समाज माध्यमावर माझ्या यांच्याविरोधात चुकीचे चित्र निर्माण करुन त्यांना बदनाम करण्याचा डाव रचण्यात आल्याचे आरोप कुलकर्णी यांनी केला असुन संबंधित उमेदवार महिलेचा मी कधी तोंड ही पाहीले नाही,केवळ रजकीय सुडबुध्दीने माझा वाढता जणाधार पाहुन माझी बदनामी करण्याच्या उद्देशाने विरोधक खोटी अफवा पसरवित आहेत असे यावेळी कुलकर्णी यांनी पत्रकारांना सांगितले. सभेची परवानगी घेण्यासाठी नगरपरिषदेत जात असताना मला अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन जीवे मारण्याच्या उद्देशाने इंद्रजीत तुडमे, माधवराव अंकुशकर व त्यांच्या साथीदाराने मारहाण केली,तेव्हा पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांनी मला त्यांच्या पासुन सुटका करुन नगरपरिषदेत बसविले,सर्वच घटना सिसिटिव्ही फुटेजमध्ये कैद असुन माझ्यासोबत अनुप अंकुशकर नसते तर या तुडमे बंधुनी माझा जीव घेतला असता असेही कुलकर्णी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत म्हटले आहे.यावेळी या पत्रकार परिषदेला जनहित पार्टीचे उमेदवार अनुप अंकुशकर, अर्जुन खंडेराय, मौवेद मौलाना यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

**प्रथम नागरीक असलेल्या व्यक्तीला मारहाण तर जनसामान्याचे काय?: अनुप अंकुशकर**

बिलोली शहरातील नगराध्यक्ष पद भुषविलेल्या व्यक्तीला जर तुडमे बंधु दादागिरी करत मारहाण करीत असतील तर जनसामान्याचे काय हाल करतील याचा सर्व जनतेने मतदानावेळी नक्कीच विचार करावा असे अनुप अंकुशकर यांनी केले.

# ऊस तोड कामगारांची आरोग्य तपासणी

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. २२ नोव्हेंबर-**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगिता देशमुख, मुखेड तालुका आरोग्य अधिकारी डॉ.आकाश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र बा-हाळी अंतर्गत श्री.शिवाजी सव्हिसेस साखर कारखाना दत्तनगर मांजरी येथे २० नोव्हेंबर रोजी ऊसतोड कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली.दर बुधवारी,तीन महिन्यासाठी ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

यामध्ये रुग्णांची लघवी, बीपी, शुगर यांची तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात येत आहे. याकामी बा-हाळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.प्राजक्ता झरीकर, आरोग्य पर्यवेक्षक व्यंकट माचनवाड, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.अमित मस्कले, आरोग्य निरिक्षक अकबर शेख,आरोग्य सहाय्यक गोपाळ पुल्लेवाड, मारोती कोकुरे, रणजित वाघमारे, इरफाना शेख, सविता गवंदे, एस. एन. इगंळे सह आरोग्य विभागाचे कर्मचारी सर्व आशा वर्कर उपस्थित होते.

# भाजपा शक्ती केंद्रप्रमुखाचा राजीनामा

**मुदखेड** -मुदखेड येथील नगरपरिषद निवडणुकीत सर्व साधारण जागेवर इतरांना उमेदवारी देऊन मराठा समाजाला वगळण्यात आल्यामुळे मुदखेड येथील भाजपाचे शक्ती केंद्रप्रमुख गंगाधर डांगे यांनी राजीनामा संबंधिताकडे दिले असल्याचे पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. गंगाधर डांगे यांनी त्यांच्या कृष्णकुंज निवासस्थानी आज दुपारी दोन वाजता पत्रकार परिषद बोलावली होती. यावेळी ते बोलताना म्हणाले की मी गेल्या पंचवीस वर्षापासून खासदार अशोकराव चव्हाण यांचा कार्यकर्ता असून माझे वडील सुद्धा कै.शंकरराव चव्हाण चे कार्यकर्तेच होते मी या निवडणुकीत अध्यक्ष पदासाठी माझ्या पत्नीचा अर्ज दाखल केला होता तेव्हा खा. अशोक चव्हाण यांनी मला नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल करा असं सांगितल्यावरून मी नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केला होता परंतु मला त्यांनी उमेदवारी दिली नाही मागील काळात मराठा समाजाचे तीन नगरसेवक होते परंतु यावेळी अशोक चव्हाण यांनी नगराध्यक्ष देऊन मराठा समाजाची एकावरच बोळवण केली खरं तर सर्वसाधारणला उमेदवारी मिळाली पाहिजे होती पण त्यांनी इतर लोकांना ज्यांनी पक्षाचे काहीच काम केले नाही त्यांना उमेदवारी देऊन मराठा समाजाला नगरसेवक पदापासून वंचित ठेवले असा आरोप गंगाधर डांगे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला.

# नगराध्यक्ष पदासाठी १० तर सदस्यपदासाठी ९६ उमेदवार रिंगणात

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २२ नोव्हेंबर-**

हदगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद खुल्या प्रवर्गातील महिलासाठी आरक्षित आहे. नगराध्यक्ष पदाकरिता सहा नोंदणीकृत पक्षांचे उमेदवार आणि चार अपक्ष उमेदवार रिंगणात असून नगरसेवक पदासाठी ९६ उमेदवार शेवटी निवडणूक रिंगणात उरले आहेत. हदगाव शहरात एकूण २३१९४ मतदार असून २७ मतदान केंद्राची स्थापना करण्यात येणार असल्याचे माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत जगताप यांनी कळविली आहे. यात एक माजी नगराध्यक्ष व अनेक नगरसेवक सुद्धा नगरसेवक पदासाठी नशिब अजमावत आहेत.

हदगाव नगरपरिषद निवडणुकीचे उमेदवारांनी माघार घेण्याचे आज शेवटच्या दिवशी एकूण सहा उमेदवारांनी माघार घेतली. यात नगराध्यक्ष पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या गीता गोपाल सारडा या अपक्ष उमेदवाराचा समावेश आहे. तर प्रभाग १ (अ) मधून विनायक पावडे प्रभाग २ (ब) मधून शहनाजबी आयुब खान, प्रभाग ७ (अ) मधून बालाजी शंकुरवार आणि सतीश पोगरे या दोघांनी तर प्रभाग ८ (ब) मधून वर्षाताई देशमुख आणि ९ (ब) मधून नागेश पवार यांनी नगरसेवक पदाच्या लढतीतून माघार घेतली. वर्षाताई देशमुख यांनी आठ ब मधून नगरसेवक पदासाठी माघार घेतली असली तरी त्यांचा दुसरा नगराध्यक्ष पदासाठीचा उमेदवारी अर्ज कायम आहे. त्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) कडून नगराध्यक्ष पदासाठीच्या प्रमुख उमेदवार आहेत. शिवसेनेकडून सीमा बालाजी घाळप्पा तर शिवसेनेकडून रोहिणी भास्कर वानखेडे आणि काँग्रेसकडून कुमुद सुनील सोनुले तसेच वंचित बहुजन आघाडी कडून चाऊस इराम आफशन जाकीर आणि रिपब्लिकन सेना या पक्षाकडून स्वरूपा अतुल चौरे हे निवडणूक लढवत आहेत याशिवाय इतर चार अपक्ष उमेदवार सुद्धा रिंगणात आहेत.

# शैक्षणिक सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी जपली पर्यावरणाच्या संवर्धनाची जाणीव

**उमरी** -येथील मॉर्डन इंग्लिश स्कूल या शाळेने मुलांची सहल विमानाने सिंधुदुर्ग येथे आयोजित केली होती .सदरील सहलीचा दुसरा टप्पा सिंधुदुर्गला विमानाने रवाना झाला. विमानाने मुलांना शाळेची सहलीच नेणारी ही पहिली शाळा असल्यामुळे सर्व नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. मुलांनी सिंधुदुर्ग येथे ऐतिहासिक सिंधुदुर्ग किल्ल्याला भेट दिली. बोट सफर केली.तिथला समुद्रकिनारा आणि सौंदर्य त्यांनी अनुभवले



पण त्यासोबत पर्यावरणाचे संवर्धन करण्याविषयी आपली जाणीव व्यक्त केली. सुंदर अशा समुद्रकिनाऱ्यावर पर्यटक येऊन प्लास्टिकच्या बाटल्या, मेनकापड इत्यादी गोष्टी टाकतात त्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होतो तसेच तिथले सौंदर्य नष्ट होते .शाळेमध्ये शिकवलेल्या या परिपाठानुसार पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी मुलांनी शैक्षणिक सहलीचा आनंद तर घेतलाच पण समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या आणि कचरा गोळा करून बाजूला केल्या .आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे नागरिक आहेत त्यांच्यामध्ये ही सामाजिक जाणीव व पर्यावरणाविषयीचे प्रेम आपुलकी रुजली जावी अशी अपेक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अनुराधा कुलकर्णी यांनी व्यक्त केली मुलानी दाखवलेल्या या संवेदनशीलतेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे . मुलांनी अनुभवलेली ही सहल अतिशय नाविन्यपूर्ण. ऐतिहासिक व सामाजिक जाणीव जपणारी आणि आनंददायी झाली अशी प्रतिक्रिया पालकांनी व्यक्त केली.

# इच्छूकांचे नाव सर्व्हेक्षणात पूढे पण तिकीट न मिळाल्याने अनेकांचा झाला हिरमोड

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २२ नोव्हेंबर-**

पक्षाच्या वतीने सर्व वार्डातील इच्छूक उमेदवारांचा सर्व्हे करण्यात आला सर्व्हेक्षनाचे ठरलेल्या मेरिटमध्ये आल्यानंतरही उमेदवारांना डावलल्याने इच्छूकांचा हिरमोड झाल्याचे पहावयास मिळाले. नाराज झालेले उमेदवार बंडाचे निशाण हाती घेवून आपले भविष्य अजमावित आहेत.भोकर नगरपरिषदेची निवडणूक चूरशीची होत असून भाजपा, काँग्रेस,दादांची राष्ट्रवादी, वंचित, एमआय एम, आदि पक्षाने आपले तगडे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले भोकर नगरपरिषदेवर मागील दहा वर्ष काँग्रेसचे वर्चस्व राहिले माजी मूख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी भाजपात आल्यानंतर त्यांचे असंख्य कार्यकर्ते भाजपात प्रवेश केले भोकर शहरात भाजपाचे वर्चस्व नसताना काही कार्यकर्ते पक्ष सोडले नाही ते पक्षाशी एकनिष्ठ राहिले अशा कार्यकर्त्यांचा होवू घातलेल्या नगरपरिषद निवडणूकित विचार केला जाईल असे वाटत होते पण अचानक आलेल्या कार्यकर्त्यांचा विचार करण्यात आल्याने पक्षनिष्टा बाळगणाऱ्यांचा शेवटी हिरमोड झाल्याचे पहावयास मिळाले काही असंतूष्ट उमेदवार बंडाचे निशाण फडकवत दूसऱ्या पक्षाकडून उमेदवारी मिळवली तर काहीजन तटस्थ असल्याचे दिसून येते उमेदवारांचे तिकिट कापल्याने ते कोणत्या पक्षाच्या उमेदवाराला सहकार्य करतील हे निकालानंतर निदर्शनास येण्याची शक्यता



वर्तविण्यात येत आहे.सर्वच राजकिय पक्षातील काही निष्ठावंत नाराज झाल्याचे पहावयास मिळाले काही प्रभागात दूरंगी तर काहि ठिकाणी तिरंगी लढती होण्याची शक्यता आहे नगराध्यक्ष पद हे सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित असताना काँग्रेस व भाजपाने ओबिसी चेहरे दिले तर दादांची राष्ट्रवादी काँग्रेसकडून बहूजनांचे नेते एक राजकारणातील अनूभवी व्यक्तीमत्वाला उमेदवारी देवून तगडे आव्हान उभे केले शिवसेनेने देखील आपले उमेदवार निवडणूक रिंगणात उतरविले भाजपा काँग्रेस राष्ट्रवादी यामध्ये लढत होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे दादांच्या राष्ट्रवादीकडे मतदारांचा कौल सद्यातरी पहावयास मिळत असून अनेक नगरसेवक यावेळी निवडूण येण्याची शक्यता दिसून येते काही प्रभागात प्रभावी उमेदवार दिल्याचे पहावयास मिळत आहे काही प्रभागात जूनेच चेहरे असल्यामूळे तेथील मतदार बदल हवा असे बोलत आहेत. अनेक ठिकाणी अटीतटीच्या लढती होण्याची शक्यता नाकारता येत नाही सर्वच पक्षांनी हि निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे.मतदार शेवटी कोणत्या उमेदवारांच्या बाजूने कौल देतील हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

# खंडोबा मंदिर परिसरात महोत्सवी हालचाल वाढली

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २२ नोव्हेंबर-**

नरसी व धनगर समाजाचे आराध्य दैवत असलेल्या भंडारा डोंगरावरील जागृत श्री खंडोबा देवाचा सत्ता- विसावा वार्षिक महोत्सव यंदा गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे. नांदेडसह विविध जिल्ह्यांतून हजारो भाविक नरसीकडे येणार आहेत.दुपारी १ वाजता गणपती मल्हारी पाटे महाराज यांच्या निवासस्थानातून पालखी सोहळा सुरू होऊन बसस्थानक मार्गे श्री खंडोबा मंदिरात पोहोचेल. अभिषेकानंतर संध्याकाळी ५ वाजता महाप्रसाद, तर रात्री ८ ते पहाटे ५ या वेळेत बळीराम महाराज सूर्यवंशी व वाघे-मंडळांच्या सहभागातून जागरण सोहळा होणार आहे. ढोल-ताशा, वाघ्या-मुरळी आणि जय मल्हारीच्या घोषात भंडारा डोंगर पुन्हा एकदा दुमदुमणार आहे.

महोत्सवाचे नियोजन श्री जागृत खंडोबा समितीचे सर्व सदस्य व सरपंच गजानन भिलवंडे, माजी जि. प. सदस्य माणिकराव लोहगांवे, माजी सरपंच व्यंकटराव कोकणे शिवसेना तालुकाप्रमुख रविंद्र भिलवंडे, उद्योगपती राजेंद्र भिलवंडे, गंगाधर वडगावे, खंडोबा भक्त गोविंदराव टोकलवाड, आनंदराव सूर्यवशी, माधव मेकॉले, माधवराव वडजे, चंद्रशेखर कोकणे, बालाजी भवरे, शंकर कोकणे, मारोतराव मांजरमे तसेच गावातीलकार्यकर्ते व सर्व ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे. बाबाराव महाराज पाटे, पांडुरंग पाटे, व्यंकटी महाराज पाटे, हानमंतराव मिसे, पांडुरंग बागडे, शिवाजी नारे, श्यामसुंदर कोकणेसह नरसीग्रामस्थांच्या सहकार्याने महोत्सवाची सुंदर आखणी करण्यात आली आहे.

# खा.अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शहराचा विकास करणार : डॉ.वानखेडे



**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २२ नोव्हेंबर-**

माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तथा नेतृत्वाखाली शहराचा विकास करण्यासाठी कटिबद्ध आहे. यासाठी मूलभूत सुविधा सह शहराचा चेहरा मोहरा बदलून विकासाची गंगा आणण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शहरासाठी वेगळा निधी मागून शहरासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे सुतवाच डॉ. राजेंद्र वानखेडे यांनी आज पत्रकार परिषदेत केले.

हिमायतनगर नगरपंचायत सार्वजनिक नगरपंचायत निवडणुकीमध्ये प्रथमच भारतीय जनता पक्षाने थेट नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवत असून या ठिकाणी वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत डॉ. राजेंद्र वानखेडे यांना उमेदवारी दिल्यामुळे महायुतीतील शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाचे नगराध्यक्ष या दोन महायुतीतील घटक पक्षांच्या उमेदवारासह काँग्रेस पक्षाचे माजी संचालक तथा माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांचे खंदे समर्थक शेख रफिक शेख महबूब यांच्यासह इतर राजकीय पक्षात थेट लढत होत असून आज शहरातील भारतीय जनता पक्षाच्या संपर्क कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ. राजेंद्र वानखेडे यांनी मी स्वतः` यावेळी पत्रकार परिषदेला भाजपचे नेते डॉक्टर अंकुश देवसरकर, गिरीश जाधव,भाजपा तालुका अध्यक्ष गजानन घायल, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. प्रसाद डोंगरगावकर ,यासह भाजपचे तालुका पदाधिकारी व पत्रकार मंडळी सह नगरसेवक पदाची इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिनविरोध निवड झालेल्या स्नेहा तमशेटे यांचा सन्मान



**मुखेड** -मुखेड नगर परिषद निवडणूक प्रचारांना आता वेग आला असून निवडणुकी अगोदरच भाजपाच्या एका उमेदवाराला विजयाचा गुलाल लागला आहे . बिनविरोध निवड झाल्याबद्दल स्नेहा संजय तमशेटे यांचा माजी नगराध्यक्ष गंगाधर राठोड यांच्या हस्ते शाल व पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला आहे. मुखेड नगर परिषद प्रभाग क्रमांक - ४ ( अ ) मधील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार स्नेहा संजय तमशेटे यांच्या विरोधातील उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज छाननीत बाद तर दुसऱ्या एका उमेदवाराने अर्ज माघार घेतल्याने स्नेहा संजय तमशेटे यांची बिनविरोध निवड झाली असून या निवडीबद्दल माजी नगराध्यक्ष गंगाधर राठोड यांनी बिनविरोध निघालेल्या स्नेहा संजय तमशेटे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा यथोचित सन्मान केला आहे. यावेळी नगराध्यक्ष गंगाधरराव राठोड, खुशाल पाटील उमरदरीकर , प्रभाग क्र. ४ ( अ ) चे भाजपाचे अधिकृत उमेदवार राजु बामणे , भाजपा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राम सावकार पत्तेवार, अनिल जाजु, नंदकुमार मडगुलवार, किशोरसिंह चौहाण, शिवाजी राठोड, शिवकुमार बंडे, संजय तमशेटे, करणं रोडगे, बबनसिंग ठाकुर, अशोक गजलवाड, नागनाथ लोखंडे ,सह भाजपाचे पदाधिकारी उमेदवार, व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# कुरेशी बिरादरी परिवारातील असंख्य तरुणांच्या प्रवेशाने काँग्रेसचे हात झाले बळकट

## देगलूरच्या इतिहासात पहिल्यांदाच उमेदवारी देत काँग्रेसने केला कुरेशी बिरादरी परिवाराचा सन्मान

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २२ नोव्हेंबर-**

नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय काँग्रेस पक्षात कुरेशी बिरादरी परिवारातील असंख्य तरुण (२१ नोव्हेंबर) शुक्रवारी प्रवेश केले आहे. या प्रवेशाने भारतीय काँग्रेस पक्षाचे हात अधीक बळकट झाले आहे. हा पक्ष प्रवेश सोहळा माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, माजी उपनगराध्यक्ष बालाजी रोयलावार आणि माजी उपनगराध्यक्ष अविनाश निलमवार यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला.

आगामी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षाचे पक्षप्रवेश होत आहेत. शुक्रवारी (२१ नोव्हेंबर) रोजी देगलूर शहरातील कुरेशी बिरादार परिवारातील असंख्य तरुणांनी पक्ष प्रवेश केल्याने आगामी निवडणुकीत पक्षाला चांगलीच ताकद मिळणार आहे.



यावेळी शेखर अरबाज, शेख अखिल, इफ्तेखर सय्यद, शेख महबूब, शेख शोएब, शेख सोहेल शेख अल्लाह, शेख साहिल, शेख रिहान, शेख इमरान, शेख असलम, शेख सोहेल शकीलसाब यांच्या अनेकांनी पक्ष प्रवेश केला आहे.

देगलूर शहरात प्रथमच कुरेशी बिरादरी परिवारातील इलियास दौलताबादी यांना नगरसेवक पदाची उमेदवारी देण्यात आल्याने आनंदाचे वातावरण पसरले आहे. आजपर्यंत कोणत्याही पक्षाने केरेशी बिरादरी परीवाराला उमेदवारी देण्याचे धाडस केले नाही केवळ वापरण्याचे काम केले आहे. परंतु काँग्रेस पक्षाने उमेदवारी देत या समाजाचा सन्मान केल्याचे सांगण्यात येते.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार म्हणाले की, आपल्या सुखदुः खात कोणत्या लोकांनी साथ दिली आहे. आपल्या शहरात विकासात्मक कामे आम्ही केले आहे. आमच्या पक्षाची भूमिका सर्वसामान्य माणसाच्या हिताची आहे. आपण ज्या विश्वासाने काँग्रेस पक्षात प्रवेश केलात त्या विश्वासाला कधीच तडा जाऊ देणार नाही, असे ते सांगितले. तर माजी उपनगराध्यक्ष अविनाश निलमवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचा चांगलाच समाचार घेतला. निलमावार भाषणात म्हणाले की, जनतेला सर्वकाही कळते. कोण कसे वागते ते त्यांना चांगले माहीत आहे. येणाऱ्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत जनता त्यांना जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही. देगलूर नगरपरिषदेवर काँग्रेसचा झेंडा फडकेल असा विश्वासही निलमवार यांनी व्यक्त केला.

दरम्यान पक्षप्रवेश करण्यापूर्वी मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. त्यानंतर कुरेशी बिरादरी परिवारातील तरुणांना पक्षप्रवेश करवून घेण्यात आले. या कार्यक्रमाचे सुंदर सुत्रसंचलन पुंडलिक टोके यांनी केले तर आभार व्यंकट रोयलावार यांनी मांडले. तसेच मुफ्ती वाजीद साब, मौलाना इरफान दौलताबादी, इलियास दौलताबादी आदीं मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित नागरिकांनी काँग्रेस पक्षाच्या पाठीशी राहण्याचे आणि विजय खेचून आणण्याचे निश्चय केल्याचे सांगण्यात येते.

यावेळी धर्मगुरू मुक्ती वाजिद साब, मौलाना इरफान दौलताबादी, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेठवार, माजी उपनगराध्यक्ष बालाजी रोयलावार, माजी उपनगराध्यक्ष अविनाश निलमवार, लक्ष्मण कंधारकर हाफिज खाँ पठाण, संजय जोशी, यादव गोरलावार, चंदन मंडलेवार, संगम बैलके, चैतन्य रोयलावार, व्यंकट रोयलावार, इलियास दौलतापदी, अख्तर पटेल, शिवाजी रोयलावार, आजिज कुरेशी, मुन्ना देसाई भायेगावकर, शोएब पटेल, दिलीप माळेगावकर, बालराज माळेगावकर, नागेश गुडलवार, नाविद अंजूम आदींची उपस्थिती होती.